epaper.mahabarbench.com

# पुणे BAR & BENCH

Journalism For Justice!

▪ PRGI No. : MHBIL/25/A1380

♦ वर्ष १ ♦ अंक : ४३ ♦ साप्ताहिक ♦ पुणे, सोमवार, दिनांक २२ जून ते २८ जून २०२६ ♦ Email : punebarandbench@gmail.com ♦ पाने : १६ ♦ स्वागतमूल्य : १० रु. अंक व जाहिरातींसाठी : ९९२२४१२४५१



माझा पहिला खटला

## केस जिंकूनही घडवला समेट!

*शिक्षिकेच्या घटस्फोटाची पहिलीच केस अपीलातही जिंकली; पण तीन वर्षांच्या लेकरासाठी आई-वडील आणले एकत्र आणि खऱ्या अर्थाने 'जिंकणं' झालं!*

पान ७

SUPER OFFER

पुणे BAR & BENCH

सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता संपर्क : श्रेयश दहिवळ, मो. ९९२२४१२४५१, ऑफिस संपर्क : ०२०-२९९९ २५३०

epaper.mahabarbench.com

वर्गणीचे पर्याय | स्वागत मूल्य : फक्त रु. १० एक वर्षासाठी रु. ५००

रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट,आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर : ९९२२४१२४५१ या क्रमांकावर मॅसेज करा!

QR Code स्कॅन करा, पे करा.

*न्यायाधीशांचे 'मीम्स' अन् 'ट्रोलिंग'; २५ सेकंदांच्या सोशल मीडियाच्या 'लाईक्स' आणि 'अटेंशन इकॉनॉमी'साठी न्यायमंदिराचा होतोय पब्लिक तमाशा?*

# विळखा लाईक, शेअर आणि कमेंट चा?

विजय चव्हाण

punebarandbench@gmail.com

फ्रेंच विचारवंत गाय डेबॉरने आपल्या प्रसिद्ध 'द सोसायटी ऑफ द स्स्पेक्टॅकल' या पुस्तकात एक भीती व्यक्त केली होती. तो म्हणाला होता, "तमाशा (स्पेक्टॅकल) म्हणजे केवळ प्रतिमांचा संग्रह नसून, ती माणसांमधील सामाजिक संबंधांची माध्यम-निर्मित मध्यस्थी असते." आज हीच भीती आपल्या लोकशाहीचा तिसरा मुख्य स्तंभ असलेल्या न्यायव्यवस्थेच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.

पान ४ पहा












YUVRAJ DHAMALE CORP

'युवराज ढमाले कॉर्प' कडून पुणे BAR & BENCH वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

# ‘पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ ही काळाची गरज’

## ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. एस. के. जैन यांची मागणी, पुणे बार असोसिएशनतर्फे बार कौन्सिलच्या नवनिर्वाचित ८ सदस्यांचा सत्कार; वकील संरक्षण कायदा व अकॅडमी स्थापनेचीही मागणी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com




पुणे आणि परिसरातील लाखो पक्षकार आणि वकिलांच्या सोयीसाठी पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू होणे अत्यंत गरजेचे आहे. बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा या निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व सदस्यांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून यासाठी एकत्रितपणे प्रामाणिक प्रयत्न करावेत, असे आग्रही आवाहन ज्येष्ठ विधीज्ञ आणि बार कौन्सिलचे माजी उपाध्यक्ष अ‍ॅड. एस. के. जैन यांनी केले.

पुणे बार असोसिएशनतर्फे सोमवार, दिनांक १५ जून २०२६ रोजी शिवाजीनगर न्यायालयातील अशोका हॉल येथे बार कौन्सिलच्या नवनिर्वाचित सदस्यांचा गौरव व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या भव्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिल निवडणूक २०२६ च्या इतिहासात प्रथमच पुणे जिल्ह्यातील तब्बल आठ उमेदवारांनी भरघोस मतांनी विजयी होऊन सदस्यपदी येण्याचा ऐतिहासिक बहुमान मिळवला आहे. याच पार्श्वभूमीवर वकिली क्षेत्रातील या अभूतपूर्व यशाचा आनंद साजरा करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

**पुणे जिल्हा वकिलांचा ऐतिहासिक विजय व विविध मागण्या**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत करताना पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. काळूराम बबन भुजबळ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पुणे जिल्ह्यातील आठ वकील प्रतिनिधी एकाच वेळी बार कौन्सिलवर निवडून येणे ही संपूर्ण जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि ऐतिहासिक गोष्ट आहे. ते पुढे म्हणाले की, पुणे येथे खंडपीठ व्हावे ही मागणी गेल्या अनेकेसून प्रलंबित आहे. आता आपले हक्काचे आठ प्रतिनिधी कौन्सिलवर गेल्यामुळे या मागणीला अधिक कायदेशीर बळ आणि गती मिळणार आहे.

याशिवाय, तरुण वकिलांना वकिलीच्या सुरुवातीच्या काळात आर्थिक स्थैर्य लाभण्यासाठी शासनाकडून 'स्टायफंड' सुरू करण्यात यावा आणि वकिलांच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला 'वकील संरक्षण कायदा' तात्काळ लागू करण्यासाठी उच्च न्यायालय व राज्य शासनाकडे आक्रमकपणे पाठपुरावा करावा, असे आवाहनही अ‍ॅड. भुजबळ यांनी आपल्या भाषणात केले.

**नवनिर्वाचित सत्कारमूर्तींचा गौरव**

या सोहळ्यात बार कौन्सिलवर नवनिर्वाचित झालेल्या पुणे जिल्ह्यातील ८ सदस्यांचा बारच्या माजी अध्यक्षांच्या हस्ते फेटा, शाल, श्रीफळ आणि स्मृतीचिन्ह देऊन सस्न्मान सत्कार करण्यात आला. यावेळी अ‍ॅड. गणेश शिरसाट, अ‍ॅड. राजेंद्र उमाप, अ‍ॅड.विठ्ठल कोंडे-देशमुख, अ‍ॅड. राजेंद्र अनभुले, अ‍ॅड. विकास ढगे पाटील, अ‍ॅड. अहमदखान पठाण, अ‍ॅड. रंजना भोसले आणि अ‍ॅड. माधवी पोतदार यांनी सत्कार स्वीकारला.

सत्कारानंतर सत्काराला उत्तर देताना सर्व नवनिर्वाचित सदस्यांनी पुणे जिल्ह्यातील वकिलांनी दाखवलेल्या अभूतपूर्व विश्वासाला तडा जाऊ देणार नाही आणि वकिलांच्या हिताचे तसेच सुरक्षेचे प्रश्न सोडवण्यासाठी बार कौन्सिलच्या माध्यमातून सदैव कटिबद्ध राहू, अशी ग्वाही दिली.

**वकिलांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण अकॅडमीची गरज**

पुढील अध्यक्षीय भाषणात ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. एस. के. जैन म्हणाले की, केवळ खंडपीठाची मागणी करून चालणार नाही, तर नवीन वकिलांना दर्जेदार कायदेशीर शिक्षण आणि न्यायालयात प्रत्यक्ष सराव मिळणे तितकेच गरजेचे आहे. यासाठी पुणे बार असोसिएशन, सर्व प्रमुख विधी महाविद्यालये आणि बार कौन्सिलने एकत्रित यावे. पुण्यात वकिलांच्या प्रशिक्षणासाठी एक स्वतंत्र आणि अत्याधुनिक 'अकॅडमी' सुरू करण्यासाठी सर्वांनी तातडीने प्रयत्न केले पाहिजेत.

**सर्व पदाधिकाऱ्यांची अलोट उपस्थिती**

हा ऐतिहासिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुणे बार असोसिएशनच्या सर्व मुख्य पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष अ‍ॅड. काळूराम बबन भुजबळ, उपाध्यक्ष अ‍ॅड. कांताराम नप्ते पाटील, अ‍ॅड. प्रतापराव मोरे, अ‍ॅड. प्रितीसिंह ज. परदेशी; सचिव अ‍ॅड. सम्राट जांभुळकर, अ‍ॅड. अभिजीत पोळ , अ‍ॅड. नेहा जांभळे-सपकाळ; खजिनदार अ‍ॅड. अंजली बांदल तसेच हिशोब तपासणीस अ‍ॅड. शिवराज निंबाळकर आणि अ‍ॅड. पुजा पवार उपस्थित होते.

यांसोबतच व्यवस्थापकीय समितीचे सन्माननीय सभासद अ‍ॅड. मयुर मराठे, अ‍ॅड. अनिल हुडे, अ‍ॅड. संध्या रायबोले, अ‍ॅड. विकास जाधव, अ‍ॅड. अमोल वडवणे, अ‍ॅड. उमेश मांजरे, अ‍ॅड. योगेश जैन, अ‍ॅड. आकाश भिलारे, अ‍ॅड. उदय शेलार, अ‍ॅड. गुंजन भोसले, अ‍ॅड. प्रितेश दळवी, अ‍ॅड. प्रज्वल गुंजाळ, अ‍ॅड. स्मिता वाघमारे, अ‍ॅड. शितल देशमुख-शिंदे, अ‍ॅड. प्रियांका घाडगे-जाधव आणि न्यायालयातील हजारो वकील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने उत्साही वातावरणात झाली.

# टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्सने नेक्स्ट जेन टियागो आणि टियागो ईव्ही. सह हॅचबॅक कार्सचे पुण्यात अनावरण




**पुणे, दि. १२/०६/२०२६ :** एक दशकाचा वारसा आणि ७ लाखांहून अधिक ग्राहकांच्या विश्वासावर आधारित टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्सने (टीएमपीव्ही) नेक्स्ट जेन टियागो लाँच केली. नवीन Tiago आणि Tiago EV या अत्याधुनिक वाहनांचे भव्य अनावरण नुकतेच हिंजवडी येथील ‘ताज विवांता’ येथे पार पडले या कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, ग्राहक, व्यावसायिक आणि प्रसारमाध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी उपस्थित होते. तसेच जीएसटी विभागाच्या सहाय्यक आयुक्त सौ. वैशाली पतंगे, प्लांट हेड, पुणे श्री. नीरज अग्रवाल, श्री. विवेक बिंद्रा, मानव संसाधन (HR) प्रमुख, टाटा मोटर्स श्री. प्रसाद शास्त्री, प्रमुख, टीसीएस श्री. राजेश रामचंदानी, उपाध्यक्ष (VP), टाटा मोटर्स प्लांट हेड, डॉ. राजन संचेती - अध्यक्ष, आयएमए डॉक्टर्स असोसिएशन यांनी विशेष उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. तसेच पुणे ऑफिसचे श्री. अमित सिन्हा, झोनल बिझनेस हेड श्री. भूषण चव्हाण, झोनल सेल्स मॅनेजर (west) श्री. जयेशकुमार पगारिया, रीजनल बिझनेस हेड, श्री. जीवा मूर्ती, सीनियर सेल्स मनेजर पुणे, टाटा मोटर्सच्या प्रतिनिधींनी नवीन Tiago आणि Tiago EV मधील आधुनिक तंत्रज्ञान, आकर्षक डिझाइन, प्रगत सुरक्षा सुविधा आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेची माहिती दिली. पर्यावरणपूरक आणि शाश्वत वाहतुकीला चालना देण्याच्या दृष्टीने Tiago EV हे वाहन ग्राहकांसाठी एक महत्त्वपूर्ण पर्याय ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुण्यांनी टाटा मोटर्सच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक करताना भारतीय वाहन उद्योगात कंपनीने निर्माण केलेल्या विश्वासार्हतेचा गौरव केला.

तसेच इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण संवर्धनास हातभार लागणार असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना नवीन वाहनांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची संधी मिळाली. आकर्षक वैशिष्ट्ये, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि ग्राहकाभिमुख सुविधांमुळे Tiago आणि Tiago EV या वाहनांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

फक्त ४.६९ लाख रूपये या सुरुवातीच्या किंमतीसह, टियागो कार डिझाइन, तंत्रज्ञान आणि मूल्याच्या बाबतीत मोठी झेप घेत हॅचबॅक सेगमेंटला नव्या उंचीवर घेऊन जात आहे ६.९९ लाख रूपये (पूर्ण मालकीहक्क) आणि बीएएएस अंतर्गत ४.६९ लाख रूपये + प्रति किमी २.६ रूपये बॅटरी ईएमआय सुरुवातीच्या किंमतीसह, टियागो. ईव्ही कार स्मार्ट इकॉनॉमिक्स, दैनंदिन व्यावहारिकता, जलद चार्जिंग आणि लाइफटाईम एचव्ही बॅटरी वॉरंटीसह ईव्हीला खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणत आहे. नवीन टियागो कार एकाच डिझाइन तत्त्वज्ञानावर आणि मूल्याच्या सामायिक आश्वासनावर आधारित दोन वेगळे मालकीहक्क अनुभव प्रदान करताना ग्राहकांच्या आकांक्षा, व्यावहारिकता आणि प्रगत तंत्रज्ञानाचे संयोजन देते.

# जाणून घ्या कायद्याची भाषा




- **अधिकारक्षेत्र (Jurisdiction) :** एखाद्या न्यायालयाला विशिष्ट खटला चालवण्याचा आणि त्यावर निर्णय देण्याचा असलेला कायदेशीर व भौगोलिक अधिकार.
- **जैसे थे आदेश (Ad-Interim Injunction):** मुख्य दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादातील मालमत्ता किंवा परिस्थिती जशी आहे तशीच ठेवण्याचा तात्पुरता मनाई हुकूम.
- **निकाल राखून ठेवणे(Judgment Reserved) :** खटल्याचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर न्यायाधीश तात्काळ निर्णय न देता, सखोल अभ्यासासाठी निकाल नंतर जाहीर करण्याचे ठरवतात.
- **सुनावणी तहकूब करणे (Adjournment):** चालू खटल्याची सुनावणी विशिष्ट कारणास्तव (उदा. वकिलांची अनुपस्थिती किंवा नवीन पुरावे) पुढील तारखेपर्यंत पुढे ढकलणे.
- **एकतर्फी आदेश (Ex-Parte Order):** खटल्यातील दुसऱ्या पक्षाला नोटीस देऊनही तो हजर न राहिल्यास, केवळ उपस्थित पक्षाची बाजू ऐकून न्यायालयाने दिलेला निर्णय.
- **मूळ अधिकारक्षेत्र (Original Jurisdiction):** काही खटले कनिष्ठ न्यायालयात न जाता थेट उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयातच दाखल करण्याचा असलेला विशेष कायदेशीर अधिकार.
- **कायद्याचा मसुदा (Bill):** संसदेत किंवा विधानसभेत कायदा बनवण्यासाठी सादर केलेला प्रस्ताव; राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर याचे 'कायद्यात' (Act) रूपांतर होते.
- **वटहुकूम (Ordinance):** संसदेचे अधिवेशन चालू नसताना, तातडीच्या परिस्थितीत राष्ट्रपती किंवा राज्यपालांनी जारी केलेला तात्पुरता कायदा.

९. **कायदेशीर अटकाव (Estoppel):** एखाद्या व्यक्तीने आधी न्यायालयात एखादी गोष्ट मान्य केली असल्यास, तिला नंतर त्या गोष्टीच्या विरुद्ध भूमिका घेण्यापासून रोखणारा नियम.

१०. **अधिकार नसणे (Coram Non Judice):** अधिकारक्षेत्र नसलेल्या न्यायाधीशांसमोर खटला चालवणे; अशा न्यायालयाने दिलेला निर्णय कायद्यानुसार निरर्थक किंवा शून्य ठरतो.

११. **स्वेच्छा निर्णय अधिकार (Discretionary Power):** कायद्याच्या चौकटीत राहून, विशिष्ट परिस्थितीत स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार योग्य निर्णय घेण्याचा न्यायालयाचा किंवा अधिकाऱ्याचा विशेष अधिकार.

१२. **विशेष अनुमती याचिका (Special Leave Petition (SLP) :** कोणत्याही न्यायालयाच्या किंवा लवादाच्या निर्णयाविरुद्ध थेट सर्वोच्च न्यायालयात अपील करण्यासाठी संविधानाच्या कलम १३६ अंतर्गत दाखल केली जाणारी याचिका.

१३. **न्यायालयात उपस्थित राहणे (Personal Appearance):** वकिलामार्फत बाजू न मांडता, न्यायालयाने आदेश दिल्यास पक्षकाराला किंवा अधिकाऱ्याला स्वतः न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहावे लागणे.

१४. **लवाद (Arbitrator):** न्यायालयीन प्रक्रियेबाहेर, दोन्ही पक्षांच्या संमतीने व्यावसायिक किंवा वैयक्तिक वाद सामोपचाराने सोडवण्यासाठी नियुक्त केलेली त्रयस्थ तज्ज्ञ व्यक्ती.

१५. **मृत्यूपूर्व जबाब (Dying Declaration) :** मरणासन्न व्यक्तीने तिच्या मृत्यूच्या कारणाविषयी दिलेला अंतिम जबाब; फौजदारी खटल्यात हा अत्यंत भक्कम पुरावा मानला जातो.

## शांतता...हे कोर्ट आहे! पुणे BAR & BENCH




संकल्पना : विजय चव्हाण

# फास्ट अँड फ्युरियस! राज्याच्या न्यायव्यवस्थेत सर्वाधिक जलद खटल्याचा नवा रेकॉर्ड होणार?

## नसरापूर नराधमाचा काळ जवळ; महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच अवघ्या १६ दिवसांत ५५ जणांची साक्ष; ३५५ पेक्षा जास्त पुरावे सादर

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

नसरापूर येथे एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिचा खून केल्याच्या प्रकरणात, राज्याच्या इतिहासात आजवर कधीही झाली नाही एवढ्या सर्वाधिक वेगाने पुरावा आणि साक्ष नोंदवण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. विशेष न्यायालयाने या खटल्याची अत्यंत गतिमान पद्धतीने सुनावणी घेत केवळ १६ दिवसांच्या विक्रमी कालावधीत तब्बल ५५ साक्षीदारांची साक्ष पूर्ण केली आहे. यामुळे या प्रकरणाचा निकाल आता अत्यंत लवकर लागण्याची शक्यता निर्माण झाली असून, जलद न्यायदानाचे हे एक आदर्श उदाहरण ठरले आहे.

**तपास आणि साक्ष नोंदणीत पोलिसांची व न्यायालयाची ऐतिहासिक गती**

नसरापूर येथील या घटनेने संपूर्ण राज्य हादरवून सोडले होते. घटना घडल्यानंतर पोलिसांनी अत्यंत वेगाने तपास करून १६ दिवसांत आरोपी भीमराव कांबळे विरोधात दोषारोपपत्र दाखल केले होते. पोलिसांनी दाखवलेल्या या तत्परतेनंतर आता सरकारनेही तितक्याच वेगाने कायदेशीर प्रक्रिया पुढे चालवली आहे.

विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरू आहे. न्यायालयाने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून या खटल्याची दररोज सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला. दररोज सुनावणी


आरोपी भीमराव कांबळे

### आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी महत्त्वाचे निर्णायक पुरावे

**प्रत्यक्षदर्शी बालकांची साक्ष:** आरोपीला मुलीला घेऊन जाताना बघणारी तीन बालके, ज्यांची अत्यंत महत्त्वाची साक्ष नोंदवली आहे.

**सीसीटीव्ही चित्रीकरण:** घटना परिसरातील महत्त्वाचे चित्रीकरण.

**डीव्हीआर:** तंत्रज्ञानाचा आधार घेत जप्त करण्यात आलेला महत्त्वाचा पुरावा.

**एनव्हीआरचा पुरावा:** नेटवर्कद्वारे प्राप्त झालेले तांत्रिक पुरावे.

**न्यायवैद्यकीय अहवाल :** प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेले वैज्ञानिक अहवाल.

**वैद्यकीय पुरावे:** पीडितेच्या तपासणीचे ठोस आणि महत्त्वाचे रिपोर्ट.

घेत न्यायालयाने अवघ्या १६ दिवसांच्या अत्यंत कमी कालावधीत ५५ जणांची साक्ष व उलटतपासणी पूर्ण केली आहे. राज्याच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासात इतक्या जलद गतीने पुरावा नोंदविला गेलेला हा पहिलाच खटला आहे.

**३५५ हून अधिक कागदोपत्री पुरावे न्यायालयात सिद्ध**

या खटल्यात केवळ साक्षीदारांच्या साक्षीच वेगाने नोंदवल्या गेल्या नाहीत, तर तांत्रिक आणि कागदोपत्री पुरावेही भक्कमपणे मांडण्यात आले आहेत. सरकारी पक्षाच्या वतीने न्यायालयात ३५५ पेक्षा जास्त महत्त्वाचे कागदपत्रे शाबीत करण्यात आली आहेत. या भक्कम पुराव्यांमुळे आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी सरकारी पक्षाची बाजू भक्कम झाली असल्याची माहिती सरकारी वकील ॲड. मिसर आणि ॲड. प्रथमेश शिंगणे यांनी दिली. तसेच, मूळ तक्रारदारांच्या वतीने ॲड. राधिका नावंदर-जोशी आणि ॲड. मनीष पाडेकर हे बाजू मांडत आहेत.

या खटल्यामध्ये कायदेशीर प्रक्रियेचा भाग म्हणून न्यायालयाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. आरोपीचे कारागृहातील वर्तन कसे आहे? तसेच त्याच्या कौटुंबिक वर्तनाचा सविस्तर अहवाल न्यायालयाने परिवीक्षाधीन अधिकारी यांच्याकडून मागविला आहे. हा महत्त्वपूर्ण अहवाल न्यायालयात प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणातील पुढील अंतिम युक्तिवाद होणार आहे. दरम्यान, बुधवारी गुन्ह्याचे मुख्य तपास अधिकारी आणि पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांची महत्त्वाची साक्ष न्यायालयात नोंदविण्यात आली. तपास अधिकाऱ्यांची साक्ष आणि उलटतपासणी पूर्ण झाल्यानंतर आता हा खटला अंतिम टप्प्यात पोहोचला असून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या ऐतिहासिक केसच्या निकालाकडे लागले आहे.

## भारतात सर्वात जलद खटले

भारतात सर्वात जलद खटल्याचा अधिकृत रेकॉर्ड बिहारमधील अररिया जिल्हा न्यायालयाच्या नावावर असून, येथे अवघ्या २४ तासांच्या आत म्हणजेच एका दिवसात ऐतिहासिक निकाल देण्यात आला होता. जुलै २०२१ मध्ये एका ८ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणात अररिया येथील विशेष पोक्सो न्यायालयाचे न्यायाधीश शशी कांत राय यांनी ४ ऑक्टोबर २०२१ रोजी एकाच दिवसात खटल्याची संपूर्ण सुनावणी पूर्ण केली होती. यामध्ये सर्व साक्षीदार तपासणे, दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकणे आणि आरोपीला दोषी ठरवून थेट जन्मठेपेची शिक्षा सुनावणे, हे सर्व कायदेशीर सोपस्कार एकाच दिवसात पूर्ण करण्यात आले. बिहार सरकारच्या गृह विभागाच्या हवाल्याने पीटीआय आणि इतर प्रमुख राष्ट्रीय वृत्तवाहिन्यांनी याला भारतातील आजवरचा सर्वात जलद खटला म्हणून अधिकृतपणे घोषित केले होते.

या ऐतिहासिक निकालापूर्वी भारतात ऑगस्ट २०१८ मध्ये मध्य प्रदेशातील दतिया जिल्हा न्यायालयाने एका बलात्कार प्रकरणाची सुनावणी आणि निकाल अवघ्या तीन दिवसांत पूर्ण केला होता. तसेच, जुलै २०१८ मध्ये मध्य प्रदेशच्याच कटनी जिल्हा न्यायालयाने एका बलात्कार प्रकरणात केवळ ५ कार्यदिवसांमध्ये सुनावणी पूर्ण करून आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली होती; ज्याची नोंद 'गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये देखील करण्यात आली होती.

पालघर जिल्हा न्यायालयाने एका अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात रोज सुनावणी घेऊन केवळ १२ दिवसांच्या आत खटल्याची प्रक्रिया पूर्ण केली होती आणि दोषीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

मुंबईतील एका विशेष सत्र न्यायालयाने पॉक्सो खटल्यात एका गुन्ह्यात अवघ्या १७ दिवसांत आरोपीला दोषी ठरवले होते.

पान १ वरून

# विळखा लाईक, शेअर आणि कमेंट चा?

पूर्वी जी न्यायालये वकिली युक्तिवाद, कायद्याचे क्लिष्ट निकष, गांभीर्य आणि शांततेसाठी ओळखली जायची, ती आज सोशल मीडियाच्या युगात अवघ्या २५ सेकंदांचा कंटेट बनण्याच्या मार्गावर आहेत. 'लाईव्ह स्ट्रीमिंग' (थेट प्रक्षेपण) च्या नावाखाली न्यायालयांचा हा रील-तमाशा न्यायव्यवस्थेचे पावित्र्य आणि प्रतिष्ठा हळूहळू नष्ट करत आहे की काय, अशी भीती आता निर्माण झाली आहे.

न्यायालयीन कामकाजात पारदर्शकता असावी आणि देशातील जनतेला कायद्याचे ज्ञान मिळावे, या उदात्त हेतूने सर्वोच्च न्यायालयाने २०१८ मधील 'स्वप्निल त्रिपाठी विरुद्ध भारताचे सर्वोच्च न्यायालय' या खटल्यात वकिलांच्या आणि न्यायाधीशांच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण सुरू करण्यास मंजुरी दिली होती. 'सूर्यप्रकाश हा सर्वोत्तम निर्जंतुकीकरण कारक आहे' या तत्त्वाचा पुनरुच्चार करत जनतेला थेट न्यायप्रक्रियेशी जोडण्याचा हा क्रांतिकारी प्रयत्न होता. मात्र, आज हाच सूर्यप्रकाश न्यायव्यवस्थेच्या मुळावर उठला आहे.

पूर्वी वकिलांचे युक्तिवाद आणि न्यायाधीशांची निरीक्षणे ही फक्त कोर्टरूमपुरती किंवा कायदेशीर वार्ताहरांपुरती मर्यादित असायची. परंतु, आज थेट प्रक्षेपणामुळे न्यायालयातील प्रत्येक हालचाल, न्यायाधीशांच्या चेहऱ्यावरील भाव, वकिलांची होणारी तारांबळ थेट कोट्यवधी लोकांच्या मोबाईल स्क्रीनवर २४ तास पोहोचत आहे. पारदर्शकतेचे रूपांतर आता थेट मनोरंजनात झाले असून, गंभीर कायदेशीर चर्चांना एखाद्या 'रियालिटी शो' सारखे स्वरूप प्राप्त झाले आहे.

### 'अटेंशन इकॉनॉमी' आणि सेलिब्रिटी संस्कृतीचा धोका

आजचे डिजिटल जग 'अटेंशन इकॉनॉमी'वर चालते, जिथे लोकांचे लक्ष वेधून घेणे आणि स्क्रोलिंग थांबवणे हेच सर्वात मोठे भांडवल आहे. सोशल मीडियावरील अल्गोरिदम मुळात अशाच गोष्टींना प्रसिद्धी देतात ज्यातून समाजात आक्रोश, वाद किंवा उपहास निर्माण होईल. जेव्हा न्यायालयांचे थेट प्रक्षेपण या डिजिटल बाजारात आले, तेव्हा यूट्यूब चॅनेल्स आणि मीम पेजेससाठी तो एका हक्काचा 'कलाकृतीचा मसाला' बनला.

न्यायाधीशांनी विचारलेले तीक्ष्ण प्रश्न किंवा वकिलांची घेतलेली फिरकी याचे छोटे-छोटे तुकडे करून, त्याला मागून डॅशिंग बॅकग्राउंड म्युझिक लावून 'सिग्मा मेल जज' किंवा 'जज साहेबांनी वकिलाला धुवून काढले' अशा मथळ्यांसह रील्स सोशल मीडियावर व्हायरल केले जात आहेत. यामुळे न्यायाधीशांची संस्थात्मक अलिप्तता नष्ट होऊन त्यांच्याभोवती एक वलय निर्माण होऊन 'सेलिब्रिटी संस्कृती' तयार होत आहे. न्यायाधीशांची ओळख त्यांच्या कायदेशीर विद्वत्तेपेक्षा त्यांच्या संवादाच्या आणि बोलण्याच्या आक्रमक शैलीवर ठरू लागली आहे.

















> ***पारदर्शकता ही न्यायव्यवस्थेचा आत्मा आहे यात शंका नाही, पण पारदर्शकतेच्या नावाखाली न्यायालयाचे 'थिएटर' किंवा 'तमाशा' होऊ देणे आत्मघातकी ठरेल. वकिली युक्तिवाद हे न्यायाधीशांना कायद्याचे पैलू समजावण्यासाठी असतात, डिजिटल जगातील प्रेक्षकांना खूश करण्यासाठी किंवा टाळ्या मिळवण्यासाठी नसतात.***

### सोशल मीडिया लाइव्ह स्ट्रीमिंगचे ५ भीषण दुष्परिणाम:

१. न्यायाधीशांवर मानसिक दबाव आणि लोकप्रियतेचा मोहः न्यायाधीशही शेवटी हाडामांसाचा माणूस असतात. सतत कॅमेऱ्याच्या निगराणीखाली राहिल्यामुळे आणि सोशल मीडियावरील लक्षावधी प्रतिक्रियांमुळे त्यांच्यावर नकळत एक मानसिक दबाव येतो. कायदेशीर अचूकतेपेक्षा लोकांच्या नजरेत आपण कसे दिसतो, आपली टिप्पणी कशी व्हायरल होईल, या 'पॉप्युलॅरिटी'च्या मोहात पडण्याचा धोका यामुळे वाढतो.

२. 'डिजिटल मीडिया ट्रायल' आणि न्यायाचा बळीः थेट प्रक्षेपणातील अर्धवट क्लिप्स पाहून सामान्य जनता सोशल मीडियावर स्वतःचाच न्यायनिवाडा सुरू करते. यामुळे न्यायालयाचा अंतिम निकाल येण्यापूर्वीच आरोपीला गुन्हेगार किंवा निरपराध ठरवून मोकळे केले जाते. या जनक्षोभाचा आणि सोशल मीडियावरील ट्रेंड्सचा न्यायालयाच्या तटस्थतेवर आणि निकालावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

३. वकिलांचे मानसिक खच्चीकरण आणि ट्रोलिंगः न्यायालयात अनेकदा नवशिक्या किंवा कनिष्ठ वकिलांची न्यायाधीशांकडून कानउघाडणी केली जाते. हा न्यायप्रक्रियेचा एक भाग आहे. मात्र, या घटनांच्या क्लिप्स बनवून जेव्हा कनिष्ठ वकिलांना सोशल मीडियावर ट्रोल केले जाते, तेव्हा त्यांच्या व्यावसायिक प्रतिमेचे कधीही न भरून निघणारे नुकसान होते आणि त्यांचे मानसिक खच्चीकरण होते.

४. संस्थात्मक गांभीर्य आणि आदराचा ऱ्हासः न्यायालयाबद्दल जनमानसात एक आदरयुक्त भीती असते. परंतु, जेव्हा न्यायालयातील अंतर्गत वाद, वकिलांची धांदल आणि न्यायाधीशांचे वैयक्तिक स्वभाव मीम्सच्या माध्यमातून चव्हाट्यावर येतात, तेव्हा न्यायालयाचे ते अलौकिक व गंभीर स्वरूप नष्ट होते. लोक न्यायालयाकडे एक 'मनोरंजनाचे साधन' म्हणून पाहू लागतात.

५. राजकीय आणि सामाजिक ध्रुवीकरणाचे केंद्रः संवेदनशील किंवा राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या खटल्यांचे थेट प्रक्षेपण होत असताना, विविध राजकीय पक्षांचे आयटी सेल आपल्या सोयीनुसार क्लिप्स कापून त्या व्हायरल करतात. यामुळे न्यायप्रक्रियेचा वापर राजकीय फायद्यासाठी आणि समाजात ध्रुवीकरण करण्यासाठी केला जातो. न्यायालय हे न्यायदानाचे केंद्र न राहता राजकीय चिखलफेकीचे मैदान बनण्याचा धोका निर्माण होतो.

### 'अति परिचयात अवज्ञा' आणि घटनात्मक संकट

एक जुनी मराठी म्हण आहे - 'अति परिचयात अवज्ञा'. जेव्हा एखादी व्यवस्था सर्वसामान्यांना अतिशय सहज आणि मनोरंजनाच्या स्वरूपात उपलब्ध होते, तेव्हा तिचे मूल्य कमी होते. न्यायालयांच्या बाबतीत नेमके हेच घडत आहे. पूर्वी न्यायाधीश हे समाजापासून आणि प्रसिद्धीपासून अलिप्त राहून आपले काम करत असत. ही अलिप्तता त्यांच्या निपक्षपातीपणाची हमी असायची.

म्हणूनच 'नरेश श्रीधर मिरजकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य' (१९६६) या ऐतिहासिक खटल्यात न्यायमूर्ती जे. सी. शहा यांनी स्पष्ट इशारा दिला होता की, "अवाजवी प्रसिद्धी ही न्यायप्रक्रियेत बाधक ठरू शकते आणि अन्यायाचे साधन बनू शकते." आज तो ६० वर्षांपूर्वीचा इशारा तंतोतंत खरा ठरताना दिसत आहे. पारदर्शकता ही न्यायव्यवस्थेचा आत्मा आहे यात शंका नाही, पण पारदर्शकतेच्या नावाखाली न्यायालयाचे 'थिएटर' किंवा 'तमाशा' होऊ देणे आत्मघातकी ठरेल. वकिली युक्तिवाद हे न्यायाधीशांना कायद्याचे पैलू समजावण्यासाठी असतात, डिजिटल जगातील प्रेक्षकांना खूश करण्यासाठी किंवा टाळ्या मिळवण्यासाठी नसतात. गेल्या काही महिन्यांत राजकीय नेत्यांच्या खटल्यांमध्ये ज्या प्रकारे न्यायालयात युक्तिवाद झाले आणि ज्या प्रकारे ते सोशल मीडियावर मांडले गेले, ती बदलत्या धोक्याची नांदी आहे.

आता वेळ आली आहे की थेट प्रक्षेपणाचे नियम अधिक कडक केले पाहिजेत. न्यायालयातील कामकाजाच्या क्लिप्स बनवून त्या व्यावसायिक फायद्यासाठी किंवा ट्रोलिंगसाठी वापरणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा टिकवून ठेवण्यासाठी न्यायाधीशांनी आणि वकिलांनीही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. कॅमेऱ्याच्या उपस्थितीमुळे न्याय प्रक्रियेच्या गांभीर्यावर आणि गुणवत्तेवर कोणताही परिणाम होणार नाही, याची काळजी घेतलीच पाहिजे. अन्यथा, आपण एक अशी डिजिटल व्यवस्था निर्माण करू जिथे 'न्याय' मिळण्याऐवजी फक्त 'व्हायरल कंटेंट' तयार होईल!

# बेकायदेशीर 'वृक्ष प्राधिकरण' कारभाराला आव्हान!

## पुणे-पिंपरी चिंचवड आयुक्तांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका; नगरसेवक, सामाजिक कार्यकर्त्यांची आयुक्तांचे निर्णय रद्द करण्याची मागणी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी निवडून आलेली संस्था उपलब्ध असूनही, 'महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण आणि जतन अधिनियम, १९७५' च्या कलम ३ अंतर्गत वैधानिक 'वृक्ष प्राधिकरण' स्थापन केलेले नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित झाल्यानंतर आयुक्तांचा 'प्रशासक' म्हणून असलेला कार्यकाळ संपुष्टात आला आहे. तरीही, दोन्ही महापालिकांचे आयुक्त बेकायदेशीरपणे स्वतःच वृक्ष प्राधिकरण म्हणून काम पाहत असून, त्यांचे हे वर्तन मनमानी आणि कायदेशीर हेतूच्या पूर्णपणे विरोधी आहे. या विरोधात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे नगरसेवक दत्ता बहिरट आणि पुण्याचे नागरी कार्यकर्ते पुष्कर कुलकर्णी यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. ही याचिका वकील सत्या मुळे यांच्यामार्फत दाखल करण्यात आली आहे.



१९७५ च्या कायद्यानुसार, पर्यावरण संरक्षण आणि वैधानिक तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी दोन्ही महापालिकांमध्ये वृक्ष प्राधिकरणाची स्थापना करणे बंधनकारक आहे. या प्राधिकरणात एक अध्यक्ष आणि ५ ते १५ सदस्य असणे आवश्यक आहे. तसेच, यामध्ये वृक्षारोपण आणि संवर्धनाचा अनुभव असलेल्या अशासकीय संस्थांमधील तज्ज्ञांचा व निवृत्त शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश केला जाऊ शकतो. जानेवारी २०२६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर आयुक्तांचे प्रशासक पद संपुष्टात आले. तरीही, १५ सदस्यांची समिती स्थापन करण्याऐवजी आयुक्त बेकायदेशीरपणे स्वतःकडेच हे अधिकार ठेवून आहेत, ज्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

वृक्ष प्राधिकरणाचे मुख्य काम आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व झाडांचे संरक्षण करणे, दर ५ वर्षांनी भौगोलिक माहिती प्रणालीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वृक्षगणना करणे हे आहे. याशिवाय, रस्त्यांचे रुंदीकरण करताना आवश्यकतेनुसार कायदेशीर प्रक्रिया पाळून वृक्षांचे पुनर्रोपण करणे, ऐतिहासिक वारसा वृक्षांचे जतन करणे आणि बेकायदेशीर वृक्षतोडीला पायबंद घालणे ही या प्राधिकरणाची जिम्मेदारी असते. कायद्यानुसार बेकायदेशीर वृक्षतोड केल्यास १ लाख रुपयांपर्यंतचा दंड आणि एक आठवड्यापासून एक वर्षापर्यंतच्या कारावासाची तरतूद आहे. मात्र, प्राधिकरण अस्तित्वात नसल्याने या कायद्याची कठोर अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केला आहे.

**कोट्यवधींचा खर्च, पण पारदर्शकता शून्य; पुण्यात वृक्षांची मोठी कमतरता:**

याचिकाकर्ते दत्ता बहिरट यांनी पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महापालिकेच्या मालकीच्या ६३,८६० फळझाडांपासून मिळणाऱ्या वार्षिक उत्पन्नाबाबत प्रश्न उपस्थित केले होते, ज्याचे समाधानकारक उत्तर प्रशासनाने दिले नाही. धक्कादायक बाब म्हणजे, २०१६ ते २०२४ या काळात महापालिकेने वृक्षगणनेवर तब्बल १३,१२,४१,८२१ रुपये (सुमारे १३.१२ कोटी) खर्च केले आहेत. मात्र, २०२१-२२ पासून वृक्ष प्राधिकरणच अस्तित्वात नसल्याने या प्रचंड खर्चाच्या उत्तरदायित्वावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

शहरी आणि प्रादेशिक विकास योजना तयार करणे आणि अंमलबजावणीच्या निकषांनुसार, ६० लाख लोकसंख्या असलेल्या पुणे शहरासाठी किमान ४ कोटी झाडांची आवश्यकता आहे. परंतु, २०२४ च्या वृक्षगणनेनुसार पुणे महानगरपालिका क्षेत्रात केवळ ५७ लाख झाडे आहेत. सध्या या क्षेत्रातील हरित आच्छादन केवळ १०.१% आहे, जी अत्यंत चिंताजनक आणि गंभीर बाब आहे. याचिकाकर्त्यांचे वकील सत्या मुळे यांनी सांगितले की, "दोन्ही महापालिका आयुक्तांनी जानेवारी २०२६ पासून वृक्ष प्राधिकरण म्हणून घेतलेल्या सर्व निर्णयांना तात्काळ स्थगिती देण्यात यावी आणि ते निर्णय रद्द करण्यात यावेत. तसेच, नवीन वृक्ष प्राधिकरणाची तात्काळ कायदेशीर स्थापना करण्याचे आदेश न्यायालयाने द्यावेत." या संदर्भात आयुक्तांकडे अनेकदा निवेदने देण्यात आली, मात्र त्यांनी कोणतीही दखल न घेतल्याने अखेर उच्च न्यायालयाचे दार ठोठावण्यात आले आहे.

# राज्याच्या विधी शिक्षण अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेला सुरुवात; ३० जूनपर्यंत नोंदणीची मुदत

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी उच्च शिक्षणांतर्गत येथे येणाऱ्या तीन वर्षीय विधी अभ्यासक्रम (एलएलबी - ३ इयर्स), बॅचलर ऑफ फिजिकल एज्युकेशन (बी.पी.एड.) आणि मास्टर ऑफ फिजिकल एज्युकेशन (एम.पी.एड.) या तीन महत्त्वाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेसाठी (कॅप) ऑनलाईन नोंदणीला अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. या तिन्ही अभ्यासक्रमांच्या प्रवेश नोंदणीसाठी राज्य सीईटी कक्षाने ३० जून २०२६ पर्यंत अंतिम मुदत दिली असून, पात्र विद्यार्थ्यांनी या कालावधीत आपले अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रवेश परीक्षेचा निकाल आणि पुढील पाऊल**

सीईटी कक्षातर्फे २०२६ या वर्षातील तीन वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची सामाईक प्रवेश परीक्षा १ आणि २ एप्रिल रोजी राज्यभरातील विविध केंद्रांवर यशस्वीरीत्या घेण्यात आली होती. या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता प्रत्यक्ष प्रवेश फेऱ्यांची प्रक्रिया सुरू झाली आहे. विधी क्षेत्रातील वाढती संधी आणि शारीरिक शिक्षण क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे.



**नोंदणी करताना विद्यार्थ्यांनीसाठी महत्त्वपूर्ण सूचना**

विद्यार्थ्यांनी केंद्रीयभूत प्रवेशासाठी (कॅप) ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करताना अत्यंत काळजीपूर्वक माहिती भरणे गरजेचे आहे. अर्ज प्रक्रियेदरम्यान कोणतीही चूक होऊ नये म्हणून सीईटी कक्षाने काही तांत्रिक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसारः

छायाचित्र आणि स्वाक्षरीः विद्यार्थ्यांनी आपला अद्ययावत पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो आणि स्वतःच्या स्वाक्षरीची प्रतिमा (सिग्नेचर इमेज) दिलेल्या निश्चित आकाराच्या जेपीजी (जेपेग) किंवा जेपीईजी स्वरूपात अचूकपणे स्कॅन करून अपलोड करावी.

शैक्षणिक कागदपत्रेः प्रवेशासाठी आवश्यक असलेली सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे, गुणपत्रिका आणि इतर संबंधित आवश्यक कागदपत्रे निश्चित आकारात पीडीएफ स्वरूपात स्कॅन करून ऑनलाईन नोंदणी करताना पोर्टलवर अपलोड करावी लागणार आहेत, असे सीईटी कक्षातर्फे स्पष्ट करण्यात आले आहे.

**संकेतस्थळावर सविस्तर यादी उपलब्ध**

प्रवेशासाठी नेमकी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, याची सविस्तर आणि तपशीलवार यादी सीईटी कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. कागदपत्रांमधील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचा प्रवेश नाकारला जाऊ नये किंवा त्याला विलंब होऊ नये, यासाठी फॉर्म सबमिट करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी सर्व अपलोड केलेल्या कागदपत्रांची अचूकता स्वतः तपासून घ्यावी.

या संपूर्ण प्रवेश प्रक्रियेबाबत, वेळापत्रक, महत्त्वाच्या सुधारित तारखा आणि वेळोवेळी होणारे बदल याविषयीची अद्ययावत व अधिकृत माहिती मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी सीईटी कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला म्हणजेच https://cetcell.mahacet.org या लिंकला नियमितपणे भेट द्यावी, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे. तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता वेळेत अर्ज पूर्ण करावेत.

# फी वाढ आणि शब्दांच्या मर्यादेमुळे 'आरटीआय'धोक्यात!

## राज्य शासनाच्या नव्या नियमावलीवर कार्यकर्त्यांचा तीव्र संताप; माहितीचा अधिकाराची पारदर्शकता धोक्यात आल्याचा आरोप

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्रातील माहिती अधिकार (आरटीआय) कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी राज्य सरकारच्या नव्याने अधिसूचित केलेल्या 'माहिती अधिकार नियम, २०२६' वर तीव्र चिंता आणि संताप व्यक्त केला आहे. विरोधकांचे आणि कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे की, या नवीन नियमांमधील अनेक अटींमुळे सामान्य नागरिकांसाठी माहिती मिळवणे अत्यंत कठीण होणार असून, २००५ च्या ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण माहिती अधिकार कायद्याच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे.

राज्य सरकारने नुकतीच जारी केलेली नवीन नियमावली महाराष्ट्रातील माहिती अधिकाराच्या जुन्या संरचनेची जागा घेणार आहे. सरकारने या बदलांचे समर्थन करताना म्हटले आहे की, आरटीआय अर्ज हाताळणीची प्रक्रिया अधिक सुटसुटीत करण्यासाठी आणि कायद्याचा होणारा 'गैरवापर' रोखण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. मात्र, माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला असून, हे बदल माहिती मागवणाऱ्यांच्या मार्गात जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करण्यासाठी आणले गेल्याचा आरोप केला आहे.

या नव्या नियमांमधील सर्वात मोठा आणि धक्कादायक बदल म्हणजे माहिती अधिकाराच्या अर्ज शुल्कात करण्यात आलेली तिप्पट वाढ होय. आतापर्यंत अवघ्या १० रुपयांमध्ये मिळणारा अर्ज आता ३० रुपयांना मिळणार आहे. इतकेच नव्हतं तर, माहितीच्या प्रती मिळवण्यासाठी लागणारे छायांकित (झेरॉक्स) शुल्क प्रति पृष्ठ २ रुपयांवरून थेट ५ रुपये करण्यात आले आहे. तसेच, कागदपत्रांची प्रत्यक्ष सरकारी कार्यालयात जाऊन तपासणी करण्यासाठी पहिल्या विनावूल्य तासानंतर प्रति तास ५० रुपये शुल्क आकारले जाईल.

सर्वात मोठा वाद निर्माण झाला आहे तो म्हणजे अर्जाच्या संरचनेवरील कडक मर्यादांमुळे. 'आरटीआय' आता प्रत्येक अर्ज केवळ




एकाच विषयापुरता मर्यादित असावा लागेल आणि तो जास्तीत जास्त १५० शब्दांत मांडावा लागेल. या अटीमुळे क्लिष्ट किंवा मोठ्या सरकारी घोटाळ्यांची माहिती एकाच अर्जात मागवणे अशक्य होईल, असे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. या नियमांमुळे अपीलाच्या प्रक्रियेवरही आर्थिक भुर्दंड पडणार आहे; पहिल्या अपीलासाठी ५० रुपये आणि राज्य माहिती आयोगासमोरील दुसऱ्या अपीलासाठी १०० रुपये शुल्क लागू करण्यात आले आहे. कार्यकर्त्यांच्या मते, या जाचक अटी माहिती अधिकार कायद्याच्या मूळ उद्दिष्टांच्या पूर्णपणे विरोधात आहेत. हा कायदा प्रशासनात उत्तरदायित्व आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी आहे , परंतु हे नवे नियम नागरिकांना निराश करणारे आहेत.

- **अर्ज शुल्कः १० रुपयांवरून थेट ३० रुपये.**
- **नक्कल शुल्क (झेरॉक्स): २ रुपयांवरून ५ रुपये प्रति पृष्ठ.**
- **शब्द मर्यादाः आरटीआय अर्ज जास्तीत जास्त १५० शब्दांचा असावा.**
- **विषय मर्यादाः एका अर्जात केवळ एकाच विषयाची माहिती मागवता येणार.**
- **ओळखपत्र सक्तीः नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी स्वाक्षांकित ओळखपत्र बंधनकारक.**
- **अपील शुल्कः पहिले अपील ५० रुपये आणि दुसरे अपील १०० रुपये.**

पुण्यातील एका ज्येष्ठ माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी यावर कडाडून टीका करताना सांगितले की, "आरटीआय कायद्याच्या मूळ तत्त्वांचे हे सरळ उल्लंघन आहे. या कायद्यानुसार, माहिती मागणाऱ्या नागरिकाला माहिती का हवी आहे याचे कोणतेही कारण देण्याची गरज नसते. परंतु, अर्ज करतानाच नागरिकत्वाचा पुरावा (ओळखपत्र) जोडण्याची सक्ती करणे आणि शब्दांची मर्यादा घालणे यामुळे केवळ कायदेशीर गुंतागुंत आणि खटलेबाजी वाढेल. यामुळे सर्वसामान्य माणूस माहिती मागवण्यापासून दूर बळकट प्रशासनापासून वंचित राहील."

तसेच, दारिद्र्यरेषेखालील नागरिकांसाठी मोफत प्रतींची संख्या केवळ ५० पृष्ठांपर्यंत मर्यादित करणे हे अत्यंत अन्यायकारक आहे. यामुळे गरिबांना मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचाराची माहिती मिळवणे कठीण होईल.

जरी सरकारने यामध्ये यूपीआय आणि ऑनलाईन पेमेंटचा पर्याय देऊन डिजिटल प्रवासाला चालना देण्याचा प्रयत्न केला असला, तरी जाचक अटींमुळे या चांगल्या बदलाची बाजू कमकुवत झाली आहे. एकूणच, या नवीन नियमांमुळे आगामी काळात राज्यभरात माहिती अधिकार कार्यकर्ते विरुद्ध सरकार असा मोठा कायदेशीर आणि रस्त्यावरील संघर्ष पेटण्याची चिन्हे दिसत आहेत.

# सरकारी नोकरी अन् संसाराची तातातूट

## दांपत्याचा परस्पर संमतीने घटस्फोट; कौटुंबिक न्यायालयाचा निकाल

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

सरकारी नोकरी मिळवणे ही अनेकांसाठी आनंदाची बाब असते. मात्र, लग्नानंतर अवघ्या महिनाभरात पत्नीला मिळालेली सरकारी नोकरी एका दांपत्याच्या संसारात दुरावा निर्माण करणारी ठरली. पत्नीच्या अपेक्षा वाढल्याने आणि परस्परांतील संवाद कमी झाल्याने पतीने क्रूरतेच्या आधारावर दाखल केलेला घटस्फोटाचा दावा अखेरीस परस्पर संमतीच्या घटस्फोटात रूपांतरित होऊन निकाली निघाला.

कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश के. व्ही. ठाकूर यांच्या न्यायालयात हा निर्णय झाला. या प्रकरणात पतीच्या वतीने ॲड. खंडेराव टाचले यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. आकाश बिराजदार यांनी सहकार्य केले. तर पत्नीच्या वतीने ॲड. महात्मे यांनी बाजू मांडली. सुरेश (वय ३२) आणि सुरेखा (वय ३०) (दोघांची नावे बदलली आहेत) हे मूळचे विदर्भातील आहेत. सुरेश खासगी नोकरीसाठी पुण्यात स्थायिक झाले होते. पारंपरिक पद्धतीने मे २०२३ मध्ये दोघांचा विवाह झाला. विवाहानंतर सुरेखा पुण्यात आली आणि संसार सुरळीत सुरू झाला. दरम्यान, लग्नापूर्वी दिलेल्या स्पर्धा परीक्षेचा निकाल लागल्यानंतर तिला सरकारी नोकरी मिळाली. त्यानंतर ती विदर्भात रुजू झाली.

नोकरी लागल्यानंतर तिच्या अपेक्षा बदलल्या. पती तसेच सासरच्या मंडळींशी संपर्क कमी झाल्याने दोघांमधील संवादात दुरावा निर्माण झाला. अखेर, लग्नानंतर दोन वर्षे चार महिन्यांनी सुरेशने कौटुंबिक न्यायालयात क्रूरतेच्या आधारावर घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान दोघांचे समुपदेशन करण्यात आले. मात्र, दोघेही पुन्हा एकत्र येण्याची शक्यता नसल्याचे समोर आले. त्यानंतर सुरेखाने परस्पर संमतीने घटस्फोट घेण्यास तयारी दर्शवली. त्यानुसार न्यायालयाने दोघांचा घटस्फोट मंजूर केला. लग्नातील सर्व स्त्रीधन सुरेखाला परत देण्यात आले असून, तिने पोटगीवरील सर्व हक्क स्वेच्छेने सोडून दिले.




*दोघेही दोन वर्षांहून अधिक काळापासून वेगवेगळे राहत होते. त्यांच्यात पुन्हा एकत्र येण्याची शक्यता नसल्याचे समुपदेशनातून स्पष्ट झाले. त्यामुळे परस्पर संमतीने घटस्फोट मंजूर करण्यात आला. या निर्णयामुळे वेळ आणि पैशाची बचत झाली असून, दोघांनाही स्वतंत्रपणे आयुष्य जगण्याची संधी मिळाली आहे.*
*– ॲड. खंडेराव टाचले, पतीचे वकील*

# वाटणीची जमीन मोजणी अवघ्या २०० रुपयांत!

## राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय; नियमित आणि द्रुतगती मोजणीसाठीही नवीन शुल्क व कालमर्यादा निश्चित

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

राज्य सरकारने जमीन मोजणीच्या शुल्क आणि वर्गीकरणात अत्यंत मोठे व महत्त्वपूर्ण बदल करत राज्यातील सर्वसामान्य जनतेला, विशेषतः शेतकऱ्यांना खूप मोठा दिलासा दिला आहे. नवीन नियमांनुसार, आता कुटुंबामध्ये आपसात झालेल्या जमिनीच्या वाटणीची मोजणी केवळ २०० रुपयांमध्ये करता येणार आहे. यासोबतच, सरकारी यंत्रणेतील दिरंगाईला चाप लावण्यासाठी नियमित मोजणी ९० दिवसांत आणि द्रुतगती मोजणी ३० दिवसांत पूर्ण करणे महसूल विभागावर बंधनकारक करण्यात आले आहे.

या ऐतिहासिक निर्णयामुळे जमीन मोजणी प्रक्रियेत होणारा उशीर आणि वर्षानुवर्षे चालणाऱ्या भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा बसेल, असा ठाम विश्वास राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

**असे असेल नवीन शुल्क व वर्गीकरण**

सरकारने जमीन मोजणीचे शुल्क पारदर्शक आणि सुटसुटीत केले असून त्याचे नवीन वर्गीकरण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे:

**कौटुंबिक वाटणी मोजणी:** न्यायालयाद्वारे झालेले वाटप किंवा कुटुंबियांच्या संमतीने होणाऱ्या मोजणीसाठी प्रति पोटहिस्सा केवळ २०० रुपये शुल्क आकारले जाईल.

**ग्रामीण भागातील मोजणी:** ग्रामीण भागात दोन हेक्टरपर्यंतच्या नियमित मोजणीसाठी २ हजार रुपये, तर तातडीने करावयाच्या द्रुतगती मोजणीसाठी ८ हजार रुपये शुल्क असेल.



**शहरी भागातील मोजणी:** शहरी भागात एक हेक्टरपर्यंतच्या नियमित मोजणीसाठी ३ हजार रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी १२ हजार रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

**गुंठेवारी मोजणी:** 'महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत' येणाऱ्या भूखंडांच्या मोजणीसाठी नेहमीच्या शुल्काच्या दीडपट शुल्क आकारण्यात येईल.

**गैरहजेरी आणि दंडविषयक कडक नियम**

नव्या नियमावलीत केवळ शुल्कात सवलत दिलेली नाही, तर अधिकारी आणि अर्जदार यांच्या जबाबदाऱ्याही निश्चित केल्या आहेत.

**पुनर्भेट शुल्क (अर्जदार गैरहजर राहिल्यास):** मोजणीच्या दिवशी जर अर्जदार स्वतः गैरहजर राहिला, तर त्याला मूळ शुल्काच्या ५० टक्के किंवा कमाल १० हजार रुपयांपर्यंत दंड (पुनर्भेट शुल्क) सोसावा लागेल.

**अधिकारी गैरहजर राहिल्यास सवलत:** जर मोजणीच्या दिवशी सरकारी भूमापक किंवा संबंधित अधिकारी अनुपस्थित राहिला, तर अर्जदाराला कोणतीही चूक नसताना भुर्दंड सोसावा लागणार नाही. अशा वेळी अर्जदाराला पुढील भेटीसाठी कोणतेही अतिरिक्त पुनर्भेट शुल्क द्यावे लागणार नाही.

उच्चतपासणी शुल्क: कनिष्ठ भूमापकाने केलेल्या मोजणीवर जर कोणाचा आक्षेप असेल, तर त्या मोजणीच्या फेरतपासणीसाठी ३ ते ५ पट अधिक शुल्क आकारले जाईल.

**सरकारी व निमशासकीय संस्थांना विशेष सवलत**

या सुधारित निर्णयामध्ये शासकीय आणि निमशासकीय संस्थांनाही जमीन मोजणी दरात मोठी सूट देण्यात आली आहे. निमशासकीय संस्थांना मोजणीच्या दरात थेट ५० टक्के सवलत देण्यात आली आहे, तर पूर्णतः शासकीय असलेल्या जमिनींच्या मोजणीसाठी ७५ टक्के इतकी घसघशीत सवलत लागू करण्यात आली आहे.

अनेकदा जमिनीची मोजणी वेळेत होत नसल्याने ग्रामीण तसेच शहरी भागातही वाद उफाळून येतात. मोजणी लवकर व्हावी यासाठी सर्वसामान्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत होता. मात्र, आता ९० दिवस आणि ३० दिवसांची कडक कालमर्यादा आखून दिल्यामुळे प्रशासकीय काम जलद गतीने होईल. या पारदर्शक नियमांमुळे जमीन महसूल क्षेत्रात एक मोठी क्रांती घडून येईल आणि नागरिकांची नाहक त्रासातून सुटका होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# जिल्हा न्यायाधीश भरती सापडली वादात; वकिलांची मुंबई उच्च न्यायालयात धाव

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

महाराष्ट्र राज्यातील जिल्हा न्यायाधीश पदासाठी सुरू असलेल्या सध्याच्या भरती प्रक्रियेला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. कार्यरत असलेल्या न्यायालयीन अधिकाऱ्यांना थेट वकिलांसाठी राखीव असलेल्या २५ टक्के कोट्यातून परीक्षा देण्यास बेकायदेशीरपणे परवानगी देण्यात आली आहे, असा दावा करत वकिलांच्या एका गटाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. यामुळे ही भरती प्रक्रिया आता कायदेशीर वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.



याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संविधानाच्या नियमांनुसार जिल्हा न्यायाधीश पदाची २५ टक्के भरती ही थेट कोट्यातून केली जाते. हा कोटा प्रदीर्घ अनुभव असलेल्या आणि प्रत्यक्ष वकिली करणाऱ्या वकिलांसाठीच राखीव ठेवण्यात आला आहे. मात्र, या भरतीमध्ये आधीपासूनच सेवेत असलेल्या न्यायिक अधिकाऱ्यांनाही (उदा. दिवाणी न्यायाधीश किंवा मॅजिस्ट्रेट) या २५ टक्के कोट्यात स्पर्धा करण्याची मुभा देण्यात आली आहे, जी पूर्णपणे नियमांचे उल्लंघन करणारी आहे. याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचा आणि संविधानाच्या कलम २३३ (२) चा हवाला दिला आहे. त्यानुसार, जी व्यक्ती आधीपासूनच केंद्र किंवा राज्याच्या सेवेत (न्यायालयीन सेवेत) कार्यरत आहे, ती थेट वकिलांच्या कोट्यातून अर्ज करण्यास पात्र ठरू शकत नाही. जर न्यायालयीन अधिकाऱ्यांना या कोट्यातून प्रवेश दिला, तर प्रत्यक्ष सराव करणाऱ्या स्वतंत्र वकिलांच्या हक्कांवर गदा येईल आणि त्यांच्यासाठी असलेल्या संधी हिरावल्या जातील, असा युक्तिवाद वकिलांच्या वतीने करण्यात आला आहे.

उच्च न्यायालयाने जिल्हा न्यायाधीश पदाच्या जागांसाठी काढलेल्या जाहिरातीतील अटी व शर्तींना या याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. आधीच न्यायिक सेवेत असणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी ६५ टक्के नियमित बढती आणि १० टक्के त्वरित बढती असे स्वतंत्र मार्ग उपलब्ध आहेत. तरीही त्यांना उर्वरित २५ टक्के कोट्यातही घुसखोरी करू देणे अन्यायकारक आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन मुंबई उच्च न्यायालय यावर काय निर्णय घेते आणि राज्य सरकार तसेच उच्च न्यायालय प्रशासनाला काय निर्देश देते, याकडे आता राज्यातील संपूर्ण कायदेशीर वर्गाचे आणि वकिलांचे लक्ष लागून राहिले आहे. या याचिकेमुळे सुरू असलेल्या भरती प्रक्रियेला स्थगिती मिळणार की ती पुढील आदेशांच्या अधीन राहणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# परदेशी विधी पदवीधारकांसाठी २४ वी पात्रता परीक्षा १५ जुलैपासून

## २५ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

परदेशातून विधी (कायदा) पदवी पूर्ण केलेल्या भारतीय नागरिकांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) द्वारे आयोजित करण्यात येणारी २४ वी पात्रता परीक्षा आगामी १५ जुलै २०२६ पासून सुरू होणार आहे. या परीक्षेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २५ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

भारतीय न्यायव्यवस्थेत वकिली करण्यासाठी परदेशी विधी पदवीधारकांना ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असते. त्यामुळे पात्र उमेदवारांनी वेळेत अर्ज सादर करण्याचे आवाहन बार कौन्सिलतर्फे करण्यात आले आहे.

या परीक्षेसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, उमेदवारांना २५ जूनपर्यंत आपले अर्ज सादर करता येणार आहेत. अर्जदारांनी अर्ज पूर्णपणे भरून, त्यावर स्वतःची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तसेच, अर्जासोबत जोडली जाणारी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि प्रमाणपत्रे स्वतः प्रमाणित केलेली असणे बंधनकारक आहे. ही सर्व कागदपत्रे व्यवस्थित स्कॅन करून अंतिम मुदतीपूर्वी संबंधित पोर्टलवर किंवा बार कौन्सिलने दिलेल्या सूचनेनुसार सबमिट करावी लागणार आहेत. अपूर्ण किंवा मुदतीनंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे 'BCI'ने स्पष्ट केले आहे.

भारतात वकिलीचा व्यवसाय करण्यासाठी 'बार कौन्सिल ऑफ इंडिया'चे काही ठराविक नियम आहेत. ज्या भारतीय नागरिकांनी परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून कायद्याची पदवी घेतली आहे, त्यांना थेट भारतात वकिली करता येत नाही. त्यांना भारतीय कायद्याची आणि न्यायव्यवस्थेची कितपत जाण आहे, हे तपासण्यासाठी बार कौन्सिल या विशेष पात्रता परीक्षेचे आयोजन करते. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच संबंधित वकिलांना भारतातील न्यायालयात प्रॅक्टिस करण्याची सनद (License) मिळते. या परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक, अभ्यासक्रम आणि परीक्षा केंद्रांची माहिती बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. उमेदवारांनी कोणत्याही ऐन वेळच्या तांत्रिक अडचणी टाळण्यासाठी २५ जूनच्या आधीच आपला अर्ज सादर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# केस जिंकूनही घडवला समेट!

***शिक्षिकेच्या घटस्फोटाची पहिलीच केस अपीलातही जिंकली; पण तीन वर्षांच्या लेकरासाठी आई-वडिलांना आणले एकत्र आणि खऱ्या अर्थाने 'जिंकणं' झालं!***



**ॲड. योगेश रुईकर**
माजी कायदा सल्लागार,
एचडीएफसी बँक



न्यायालयाच्या पायऱ्या चढताना प्रत्येक नवोदित वकिलाच्या मनात एक अनामिक धाक असतो. तो धाक केवळ कायदेशीर तरतुदींचा नसून, तो असतो आपल्यावर सोपवलेल्या जबाबदारीचा. आजही मला तो दिवस स्पष्ट आठवतो, जेव्हा ज्येष्ठ विधिज्ञ विजयराव काळे सरांनी माझ्याकडे बघून अत्यंत आत्मविश्वासाने सांगितले होते, "योगेश, आजची उलटतपासणी तू करणार आहेस."

मी वकिली व्यवसायात येऊन अवघे एक वर्ष झाले होते. तोपर्यंत माझा बहुतांश वेळ न्यायालयात साक्ष ऐकण्यात, फाईल्स तयार करण्यात आणि वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयीन प्रक्रिया समजून घेण्यात गेला होता. पण अचानक मिळालेली ही संधी, जी प्रत्येक तरुण वकील स्वप्नात पाहत असतो, ती त्याच वेळी भीतीदायकही वाटत होती. कोर्ट रूम गजबजलेली होती. मागे ज्येष्ठ वकिलांच्या रांगा होत्या. प्रत्येक प्रश्न, प्रत्येक शब्द मोजून-मापून बोलायचा होता. त्या पहिल्याच स्वतंत्र उलटतपासणीने मला अशा गोष्टी शिकवल्या, ज्या कोणत्याही पुस्तकात सापडणे कठीण होते.

**वकिलीचा प्रवास आणि गुरुजनांचे मार्गदर्शन**

माझा वकिलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वैयक्तिक अनुभवातून घडला. मराठी माध्यमातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर सिम्बायोसिस लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. वडिलांच्या प्रदीर्घ आजारपणामुळे हॉस्पिटल आणि सरकारी कार्यालयांत होणाऱ्या फेऱ्यांनी मला कागदपत्रे, कायदेशीर प्रक्रिया आणि नियमावलीचे महत्त्व पटवून दिले होते. १९९७ मध्ये वडिलांच्या निधनानंतर माझ्या आईने मला खंबीर पाठिंबा दिला आणि मला ॲड. विजयराव काळे सरांच्या मार्गदर्शनाखाली जाण्याचा सल्ला दिला. तो सल्ला माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला.

२००१ मध्ये जेव्हा मी काळे सरांच्या चेंबरमध्ये प्रवेश केला, तेव्हा मला समजले की कायदा शिकणे आणि कायदा प्रॅक्टिस करणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. 'कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर' हा तर एक अथांग महासागर आहे. सरांची प्रॅक्टिस दिवाणी, कौटुंबिक, कामगार, ग्राहक आणि सहकारी न्यायालयांपर्यंत विस्तारलेली होती. सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंतचा आमचा दिनक्रम चालायचा. खटल्याची तयारी कशी करावी, समन्स कसे काढावेत, रिपोर्ट का उशिरा येतात, यांसारख्या सूक्ष्म गोष्टी सरांनी आम्हाला शिकवल्या. केवळ कायदेशीर विजय महत्त्वाचा नसून, क्लायंटला प्रामाणिक मार्ग दाखवणे हे वकिलीचे खरे गमक असल्याचे त्यांनी बिंबवले. ॲड. विशाल काळे आणि ॲड. राहुल नुणेकर यांचे मार्गदर्शनही मला त्याच वेळी मिळाले. ॲड. विशाल काळे सरांनी मला खटल्याची सखोल तयारी आणि 'रोजनामा' वाचण्याची शिस्त लावली, जी आजही माझ्या प्रॅक्टिसचा पाया आहे.

**'भिंगारदिवे' केस आणि आत्मविश्वास**

माझ्या पहिल्या उलटतपासणीचा प्रसंग 'भिंगारदिवे' केसशी संबंधित होता. ती केस जिंकल्यानंतर विरुद्ध पक्षाने अपील केले. ते अपीलही सरानी मलाच लढायला सांगितले. त्या वेळी न्यायाधीशांच्या आसनावर श्री. एन. डी. देशमुख सर होते. एका तरुण वकिलावर विश्वास दाखवून त्यांनी माझे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि निकाल आमच्या बाजूने दिला. त्या पहिल्या यशाने माझ्यातील आत्मविश्वास द्विगुणित केला. मात्र, खरा भावनिक अनुभव एका कौटुंबिक खटल्याने दिला.

**तंट्याकडून सलोख्याकडेः माझ्या कारकिर्दीतील एक अविस्मरणीय अनुभव**

२००३ ची गोष्ट आहे. एक शिक्षिका माझ्याकडे आली. तिच्या पतीने तिच्यावर क्रूरतेचा आरोप करत घटस्फोटाचा दावा दाखल केला होता. त्यांना तीन वर्षांचा एक मुलगा होता. मी ही केस स्वीकारली आणि ट्रायलपासून ते अंतिम युक्तिवादापर्यंत सर्व काही स्वतः हाताळले. कौटुंबिक न्यायालयाने निकाल माझ्या क्लायंटच्या बाजूने दिला. पती उच्च न्यायालयात गेला, पण तिथेही विजय आमचाच झाला. कायदेशीरदृष्ट्या आम्ही जिंकलो होतो, पण तरीही मला वाटत होते की हे नाते संपायला नको. मधल्या काळात मी पतीच्या वकिलांशीही चर्चेचे प्रयत्न केले. अखेर, अपीलचा निकाल लागल्यानंतर ते पती माझ्याकडे आले आणि त्यांनी पुन्हा संसार थाटण्याची इच्छा व्यक्त केली. जेव्हा ते दाम्पत्य पुन्हा एकत्र आले आणि त्या तीन वर्षांच्या मुलाला आई-वडील दोघेही मिळाले, तेव्हा मला मिळालेला आनंद कोणत्याही कायदेशीर विजयापेक्षा मोठा होता. त्या दिवशी मला समजले की, वकिली म्हणजे केवळ खटले जिंकणे नव्हे, तर तुटणारी नाती जोडणे आणि माणसांना सन्मानाने जगण्यास मदत करणे हेही आहे.

**तरुण वकिलांसाठी काही शब्द**

आज दोन दशकांनंतर मागे वळून पाहताना मला वाटते की, वकिली ही एक जबाबदारी आहे. जेव्हा मी एखाद्या महिलेची बाजू मांडतो, तेव्हा मी तिला माझी बहीण किंवा मुलगी समजून युक्तिवाद करतो. यामुळे माझ्या कामात एक मानवीय संवेदनशीलता येते. आजच्या डिजिटल युगात ई-फायलिंग आणि तंत्रज्ञान सोयीचे झाले असेल, पण तयारी, न्यायबुद्धी आणि सचोटी याला पर्याय नाही.

माझ्या या प्रवासात पहिल्या उलटतपासणीने मला आत्मविश्वास दिला, पहिल्या अपीलाने तयारीचे महत्त्व शिकवले, तर पहिल्या कौटुंबिक खटल्याने मला सहानुभूती दिली. निकाल आणि आदेश महत्त्वाचे असतातच, पण जेव्हा एखादे कुटुंब पुन्हा एकत्र येते, तेव्हा मिळणारा तो 'विजय' न्यायालयाच्या भिंतींच्या पलीकडचा असतो. एक वकील म्हणून जेव्हा तुम्ही कायद्याच्या चौकटीत राहून सामाजिक हित साध्य करता, तेव्हा तुमची खरी ओळख निर्माण होते.

शेवटी, मी इतकेच म्हणेन की, कायदा हे केवळ नियमांचे पुस्तक नाही, तर ते समाजाच्या कल्याणाचे साधन आहे. 'भिंगारदिवे' केसने मला तांत्रिक बाबींमध्ये तरबेज केले, पण त्या कौटुंबिक खटल्याने मला माणुसकीची शिकवण दिली. कोणत्याही तरुण वकिलाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, तुम्ही कोर्टात युक्तिवाद करत असताना फक्त फाईल्स वाचत नसता, तर तुम्ही मानवी आयुष्यांशी खेळत असता. त्यामुळे तुमची प्रत्येक कृती जबाबदारीची आणि संवेदनशीलतेची असावी. तोच माझ्या आयुष्यातील खरा आणि सर्वात मोठा विजय आहे. आणि अशा प्रकारे माझ्या वकिलीचा प्रवास एका ध्येयाकडे, एका जबाबदारीकडे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एका माणुसकीच्या मार्गाकडे वळला.

**मुलाखत आणि शब्दांकनः ॲड. मानसी चव्हाण**


# इतर शुल्कात प्रचंड कपात; 'आयएलएस' उच्च न्यायालयात

## विद्यापीठाच्या परिपत्रकाला आव्हान, शुल्क ३६,७९० रुपयांवरून थेट ४,३४० रुपयांवर

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विधी अभ्यासक्रमाच्या 'इतर शुल्कात' केलेली प्रचंड कपात पुणे येथील नामांकित 'आयएलएस लॉ कॉलेज'ला रुचलेली नाही. विद्यापीठाने ३० एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकाविरोधात आयएलएस लॉ सोसायटी आणि महाविद्यालयाने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर उच्च न्यायालयात तातडीने सुनावणी होण्याची शक्यता असून, यामुळे शैक्षणिक आणि कायदेशीर वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विद्यापीठाने ३ व ५ वर्षांच्या एलएलबी अभ्यासक्रमांसाठी 'इतर शुल्क' म्हणून केवळ ४,३४० रुपये निश्चित केले आहेत. विशेष म्हणजे, मागील शैक्षणिक वर्षात (२०२५-२६) महाविद्यालयाने याच शीर्षकाखाली विद्यार्थ्यांकडून तब्बल ३६,७९० रुपये वसूल केले होते. विद्यापीठाच्या या नवीन निर्णयामुळे महाविद्यालयाच्या शुल्कात थेट ३२ हजार रुपयांपेक्षा जास्त घट झाली आहे. विद्यापीठाचा हा निर्णय अत्यंत मनमानी, एकतर्फी आणि कायदेशीर अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे, असा दावा महाविद्यालयाने आपल्या याचिकेत केला आहे. तसेच, या विषयावर निर्णय घेण्यापूर्वी आपली बाजू ऐकून घेतली गेली नाही, अशी तक्रारही कॉलेज प्रशासनाने केली आहे. मागील वर्षात महाविद्यालयाने 'इतर उपक्रम', 'देखभाल' आणि 'सुविधा' अशा विविध 'इतर'शीर्षकांखाली




विद्यार्थ्यांकडून भरमसाठ शुल्क वसूल केले होते. या शुल्काला विद्यापीठाची कोणतीही वैधानिक मंजुरी नव्हती, असा आरोप करत एका विद्यार्थ्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य उच्च शिक्षण विभागाने या प्रकरणाची सखोल चौकशी केली होती.

चौकशी समितीच्या अहवालानंतर, राज्य शासनाने महाविद्यालयाला विद्यार्थ्यांकडून घेतलेले 'अतिरिक्त शुल्क' परत करण्याचे (Refund) आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुल्क रचनेत बदल करून इतर शुल्क कमालीचे कमी केले. मात्र, महाविद्यालयाने या कारवाईलाच न्यायालयात आव्हान दिले आहे. महाविद्यालयाने दाखल केलेल्या नव्या याचिकेत, विद्यापीठाच्या ३० एप्रिलच्या परिपत्रकाला स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे. जोपर्यंत अंतिम निर्णय लागत नाही, तोपर्यंत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या जुन्या शुल्क रचनेनुसारच 'इतर शुल्क' वसूल करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती कॉलेजने केली आहे. याशिवाय, प्रवेश प्रक्रिया किंवा प्रवेश परीक्षांच्या काळात विद्यापीठ अथवा शासनाने कॉलेजवर कोणतीही दंडात्मक किंवा सक्तीची कारवाई करू नये, अशी अंतरीम दादही मागण्यात आली आहे. आता या प्रकरणी उच्च न्यायालय काय निर्णय देते, याकडे विद्यार्थी आणि पालक संघटनेचे डोळे लागले आहेत.

# पतीच्या निधनानंतर पोटगीत वाढ मागण्याचा अधिकार नाही

## मुंबई उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय : मृत पतीच्या मालमत्तेतून थकीत आणि आधीच निश्चित केलेली पोटगी वसूल करता येईल

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

घटस्फोटित महिलेच्या पोटगी अधिकाराबाबत मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निकाल दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, पतीच्या मृत्यूनंतर घटस्फोटित पत्नी पूर्वी ठरवून दिलेल्या पोटगीच्या रक्कमेत वाढ करण्याची मागणी करू शकत नाही. पतीच्या निधनामुळे दोन्ही पक्षांमधील वैवाहिक कायदेशीर संबंधांचे स्वरूप बदलते आणि त्यामुळे अशा प्रकारची वाढीव मागणी करणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा निर्णय एका याचिकेच्या सुनावणीदरम्यान दिला. मलबार हिल येथील एका महिलेने कौटुंबिक न्यायालयाच्या निर्णयाविरोधात २०२३ मध्ये उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. या महिलेच्या पतीचे २०१२ मध्ये निधन झाले होते. पतीच्या मृत्यूनंतर तिने पोटगीच्या रक्कमेत वाढ करण्याची मागणी केली होती, जी कौटुंबिक न्यायालयाने फेटाळून लावली होती. याच निर्णयावर शिक्कामोर्तब करत




उच्च न्यायालयाने कौटुंबिक न्यायालयाचा निर्णय योग्य ठरवला.

न्यायालयोने आपल्या निकालात पत्नीचा पोटगीचा अधिकार हा तिचा वैयक्तिक अधिकार असल्याचे मान्य केले आहे. जोपर्यंत ती जिवंत आहे, तोपर्यंत हा अधिकार अबाधित राहतो आणि तो तिच्याकडून हिरावून घेतला जाऊ शकत नाही. तसेच, हा अधिकार तिच्या मृत्यूनंतर कोणाकडेही हस्तांतरित केला जाऊ शकत नाही. परंतु, पतीच्या निधनानंतर या अधिकाराला काही मर्यादा येतात, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

न्यायाधीश भारती डांगरे यांनी निकालपत्राचे लेखन करताना स्पष्ट केले की, घटस्फोटित पत्नी मृत पतीच्या हयातीत निश्चित झालेली आणि आदेशित केलेली पोटगी त्याच्या मालमत्तेतून किंवा इस्टेटमधून वसूल करू शकते. पतीच्या मृत्यूनंतरही ही वसुली तिच्या हयातीपर्यंत सुरू राहू शकते. जर पोटगीची काही रक्कम थकीत असेल, तर ती रक्कम सुद्धा मृत पतीच्या संपत्तीतून वसूल करण्याचा पूर्ण अधिकार पत्नीला आहे.

मात्र, पोटगीच्या रक्कमेत वाढ करण्याच्या मुद्द्यावर न्यायालयाने कडक भूमिका घेतली. जर पतीच्या निधनानंतरही पोटगी वाढवून देण्याची मागणी मान्य केली, तर त्याचे परिणाम अत्यंत विसंगत आणि अनिश्चितता निर्माण करणारे ठरतील. यामुळे खटल्यांची पूर येईल आणि कधीही न संपणारे वाद निर्माण होतील. उत्तराधिकार कायद्यातील 'अंतिमता' या तत्त्वाचा यामुळे पराभव होईल, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

या प्रकरणात प्रतिवादीच्या वतीने ॲडव्होकेट प्रदीप चव्हाण यांनी बाजू मांडली. त्यांच्या युक्तिवादाशी सहमती दर्शवत न्यायालयाने स्पष्ट केले की, कायद्याची अंतिमता आणि सामाजिक स्थैर्य राखण्यासाठी पतीच्या मृत्यूनंतर पोटगी वाढवण्याचा अधिकार नाकारणे आवश्यक आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे आता वारसा हक्क आणि घटस्फोटित महिलांच्या आर्थिक हक्कांच्या सीमा अधिक स्पष्ट झाल्या आहेत.

# वडिलांच्या मृत्यूचे कारण टीबी!

## ६ वर्षांनंतर मुलाची निर्दोष सुटका, भांडुपमधील हत्या प्रकरणातून मारहाणीमुळे मृत्यू न झाल्याचे स्पष्ट

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

वडिलांच्या हत्येच्या आरोपाखाली तब्बल सहा वर्षे तुरुंगात काढल्यानंतर, अखेर वैद्यकीय पुराव्यांच्या आधारे एका ४० वर्षीय व्यक्तीची मुंबई सत्र न्यायालयाने निर्दोष सुटका केली आहे. २०२० मधील या घटनेत मृत वृद्ध पित्याचा मृत्यू मुलाच्या मारहाणीमुळे नव्हे, तर क्षयरोगामुळे (टीबी) झाल्याचे वैद्यकीय अहवालातून स्पष्ट झाले आहे, अशी माहिती IMAGE_२.PNG मधील बातमीवरून समोर आली आहे.

सचिन गोरिवले असे निर्दोष सुटका झालेल्या व्यक्तीचे नाव असून, त्याच्यावर ७० वर्षीय वडील कृष्ण गोरिवले यांच्या हत्येचा आरोप होता. एप्रिल २०२० मध्ये भांडुप येथील राहत्या घरी किरकोळ कारणावरून झालेल्या वादात सचिनने वडिलांना बांबूच्या काठीने मारहाण केल्याचा आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप पोलिसांनी केला होता. याप्रकरणी भांडुप पोलिसांनी त्याला अटक केली होती.

सुनावणीदरम्यान शवविच्छेदन (पोस्टमॉर्टम) करणारे डॉक्टर शिवाजी पाटील यांचे पुरावे न्यायालयात सादर करण्यात आले. कृष्ण गोरिवले हे क्षयरोगाने ग्रस्त होते आणि त्यांच्या शरीरावर असलेल्या जखमा त्यांच्या मृत्यूला कारणीभूत नव्हत्या, असे डॉक्टरांच्या पुराव्यावरून स्पष्ट झाले. उलटतपासणी दरम्यान डॉक्टरांनीही मान्य केले की, कृष्ण गोरिवले यांचा मृत्यू टीबीमुळे झाला होता. त्यामुळे कृष्ण गोरिवले यांचा मृत्यू मानवी वधाचा (हॉमिसाइडल) प्रकार नव्हता, असे मुख्य न्यायाधीश एस. एस. आडकर यांनी निकाल देताना स्पष्ट केले.



सरकारी पक्षाच्या दाव्यानुसार, २०२० मध्ये आरोपी, त्याचे आई-वडील आणि बहीण भांडुप येथील एका फ्लॅटमध्ये राहत होते. २५ एप्रिल २०२० रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास किरकोळ कारणावरून आरोपी आणि वडिलांमध्ये वाद झाला. या वादादरम्यान आरोपीने वडिलांच्या पाठीवर आणि मांड्यांवर काठीने वार केले. काही वेळानंतर वडील खाटेवर जाऊन झोपले. दुपारी ३ वाजताच्या सुमारास जेव्हा आरोपीची आई त्यांना जेवणासाठी उठवायला गेली, तेव्हा त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर त्यांना मुलुंड येथील एम. टी. अग्रवाल जनरल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले होते. तथापि, संपूर्ण खटल्यामध्ये वैद्यकीय अहवाल अत्यंत महत्त्वाचा ठरला. मारहाण आणि मृत्यूचा थेट संबंध नसल्याचे सिद्ध झाल्याने न्यायालयाने सचिन गोरिवले याला हत्येच्या आरोपातून पूर्णपणे दोषमुक्त केले आहे.

# ५ वर्षांच्या विधी अभ्यासक्रमाचा अधिकृत सीईटी निकाल जाहीर

## पुण्याच्या स्पंदना वत्ससह दोघांना १०० पर्सेन्टाईल

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com


महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी कक्ष) उच्च शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या पाच वर्षांच्या विधी अभ्यासक्रमाच्या सामायिक प्रवेश परीक्षेचा (सीईटी) निकाल अधिकृतपणे घोषित करण्यात आला आहे. या संपूर्ण परीक्षेत दोन विद्यार्थ्यांनी १०० पर्सेन्टाईल गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील आणि राज्याबाहेरील प्रत्येकी एका विद्यार्थ्याचा समावेश आहे. पुणे येथील स्पंदना वत्स आणि रेवाडी (हरियाणा) येथील सिद्धार्थ यादव अशी या १०० पर्सेन्टाईल मिळवणाऱ्या दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांची नावे आहेत. सीईटी कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांचे गुणपत्रक आणि निकाल त्यांच्या वैयक्तिक लॉगिन आयडीवर उपलब्ध करून देण्यात आले असून, पाच वर्षांच्या विधी अभ्यासक्रमाची केंद्रीय प्रवेशप्रक्रिया (कॅप राउंड) देखील लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रवेश परीक्षेचे आयोजन ८ मे रोजी राज्यातील विविध केंद्रांवर दोन वेगवेगळ्या सत्रांमध्ये करण्यात आले होते. या परीक्षेसाठी राज्यभरातून आणि राज्याबाहेरून एकूण ३७ हजार १४० विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी केली होती. त्यापैकी दोन्ही सत्रां मिळून २९ हजार २८८ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली, तर उर्वरित विद्यार्थी गैरहजर राहिले होते. परीक्षा देणाऱ्या एकूण उमेदवारांमध्ये १३ हजार ५२९ विद्यार्थी (मुले) आणि १५ हजार ७५७ विद्यार्थिनींचा (मुली) समावेश होता. यासोबतच, दोन तृतीयपंथीय विद्यार्थ्यांनीही ही परीक्षा यशस्वीरित्या दिली आहे.

भौगोलिक आकडेवारीचा विचार केला असता, या परीक्षेत महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा टक्का सर्वाधिक होता. राज्यातील एकूण २६ हजार ३६२ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, तर देशातील इतर राज्यांमधून २ हजार ९२६ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. विद्यार्थ्यांची मोठी संख्या आणि परीक्षा पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी सीईटी कक्षाने जय्यत तयारी केली होती. राज्यातील एकूण ३६ जिल्ह्यांमध्ये मिळून तब्बल १२० परीक्षा केंद्रांवर या परीक्षेचे नेटके नियोजन करण्यात आले होते. निकाल जाहीर झाल्यामुळे आता विधी शाखेत करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे लक्ष आगामी प्रवेश प्रक्रियेकडे लागले आहे.

# ‘सॉलिसिटर ऑफ इंग्लंड अँड वेल्स’

***‘सॉलिसिटर’ म्हणून पात्रता मिळवणे आता केवळ इंग्लंडमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी मर्यादित राहिलेले नाही, तर जगभरातील, विशेषतः भारतीय अनुभवी वकिलांसाठी हे एक करिअरचे महत्त्वाचे दालन ठरत आहे.***



***दोन वर्षांच्या 'कार्य अनुभवा'च्या (QWE) अटीतून थेट सूट; बदलत्या नियमांमुळे इंग्लंड आणि वेल्समध्ये वकिलीचे मानांकन मिळवणे आता झाले अधिक सुलभ.***

***परीक्षेच्या माध्यमातून भारतीय वकिलांसाठी आंतरराष्ट्रीय लॉ फर्म्स आणि कॉर्पोरेट क्षेत्रात करिअरचे नवे दालन; नोकरी सांभाळून भारतातूनच परीक्षा देण्याची सुवर्णसंधी***

आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत सीमांचे महत्त्व कमी होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय व्यवहार आणि सीमापार होणारे वाद यामुळे कायदेशीर जगताचे स्वरूप बदलले आहे. अशा वेळी, इंग्लंड आणि वेल्समधील 'सॉलिसिटर'ची पदवी हे केवळ एक नामांकन नसून, ती एक जागतिक ओळख आहे. इंग्रजी कायदा (English Law) हा जगातील अनेक महत्त्वाच्या व्यावसायिक करारांसाठी, बँक-फायनान्स व्यवहार आणि लवादाच्या प्रकरणांसाठीचा आधार मानला जातो. लंडन हे आजही जगातील कायदेशीर आणि आर्थिक केंद्र असल्याने, इंग्लंडचे सॉलिसिटर असणे हे तुमच्या प्रोफेशनल प्रोफाइलमध्ये एक अत्यंत प्रभावी भर टाकते.

## भारतीय वकिलांसाठी हा मार्ग का महत्त्वाचा?

भारतातील वकिलांकडे प्रदीर्घ अनुभव आणि सखोल कायदेशीर समज असते. मात्र, जेव्हा ते जागतिक स्तरावर काम करण्याचा विचार करतात, तेव्हा त्यांना एक 'ग्लोबल क्रेडेंशियल' आवश्यक असते. सॉलिसिटर म्हणून पात्र झाल्यावर:

**१. आंतरराष्ट्रीय फर्म्समध्ये प्रवेश:** अनेक जागतिक 'मॅजिक सर्कल' लॉ फर्म्स आणि आंतरराष्ट्रीय इन-हाउस लीगल टीम्समध्ये काम करण्याची संधी मिळते.

**२. आंतरराष्ट्रीय लवाद :** आंतरराष्ट्रीय वाद निवारणामध्ये करिअर करू इच्छिणाऱ्यांसाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

**३. वैयक्तिक ब्रँडिंग:** आपल्या स्वतःच्या देशातील बाजारपेठेतही 'इंग्लिश लॉ क्वालिफाईड' असणे हे तुमच्या क्लायंटच्या नजरेत तुमचा विश्वासार्हता वाढवते.

एसआरए (SRA) कडून विशेष सवलती सॉलिसिटर्स रेग्युलेशन अथॉरिटीने (SRA) परदेशी वकिलांच्या अनुभवाची दखल घेतली आहे. भारतीय वकिलांना यासाठी दोन वर्षांचा 'क्वालिफायिंग वर्क एक्सपिरियन्स' (QWE) पुन्हा पूर्ण करण्याची गरज नाही. तुमचा भारतातील कामाचा अनुभव या अटीला पूर्ण करतो. याशिवाय, ज्या देशांतील वकिलांना सवलत मिळू शकते, अशा यादीत अनेक भारतीय वकिलांचा समावेश होतो. यामुळे 'SQE२' (स्किल असेसमेंट) परीक्षेतून बहुतांश वकिलांना सूट मिळण्याची शक्यता असते, ज्यामुळे परीक्षेचा ताण निम्म्याने कमी होतो.


**परीक्षेचे स्वरूप:** SQE१ आणि त्याची तयारी परदेशी वकिलांना मुख्यत्वे 'SQE१' परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा केवळ ज्ञानाची चाचणी नसून ती कायदेशीर नियमांच्या उपयोगाची चाचणी आहे.

**अभ्यासक्रम:** यात कॉन्ट्रॅक्ट लॉ, टॉर्ट्स, क्रिमिनल लॉ, प्रॉपर्टी लॉ, बिझनेस लॉ आणि पब्लिक लॉ यांसारख्या विषयांचा समावेश असतो.

**कठिणता:** जरी भारतीय वकिलांना कायद्याची उत्तम समज असली, तरी इंग्लंडचा कायदा आणि तिथल्या परीक्षेची पद्धत भारतीय पद्धतीपेक्षा वेगळी आहे. त्यामुळेच, शिस्तबद्ध अभ्यास आणि 'मॉक टेस्ट्स'चा सराव करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**वेळेचे नियोजन:** अनेक वकील नोकरी सांभाळून या परीक्षेची तयारी करतात. साधारणपणे ९ ते १८ महिन्यांचा कालावधी यासाठी पुरेसा मानला जातो.

परीक्षेसाठी इंग्लंडला जाण्याची गरज आहे का? हे या प्रवासाचे सर्वात मोठे आकर्षण आहे. तुम्हाला परीक्षेशी संबंधित प्रवासाचा कोणताही खर्च किंवा व्हिसाची कटकट करण्याची गरज नाही. 'पिअर्सन व्ह्यू' (Pearson VUE) या आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत ही परीक्षा भारतातील प्रमुख शहरांसह जगभरातील केंद्रांवर घेतली जाते. त्यामुळे, तुम्ही पुण्यात किंवा भारतातील कोणत्याही शहरात बसून लंडनची प्रतिष्ठित वकिली पदवी मिळवू शकता.



आर्थिक नियोजन आणि गुंतवणुकीचे टप्पे या प्रक्रियेत तीन मुख्य खर्च असतातः एसआरए (SRA) कडून होणारी फी, परीक्षा फी आणि तयारीसाठीच्या कोचिंग किंवा मटेरियलचा खर्च. ही केवळ फी नसून ती आपल्या करिअरमधील एक महत्त्वाची गुंतवणूक आहे. ज्याप्रमाणे आपण पदवी शिक्षणासाठी गुंतवणूक करतो, त्याचप्रमाणे ही गुंतवणूक भविष्यातील आंतरराष्ट्रीय संधींचे दरवाजे उघडते. योग्य कोचिंग संस्थांची निवड करणे, जे परदेशी वकिलांसाठी विशेष अभ्यासक्रम तयार करतात, हे यशासाठी अनिवार्य आहे.

## यशस्वी वकिलांसाठी काही महत्त्वाच्या टिप्स

**१. लवकर सुरुवात:** एसआरए पोर्टलवर (mySRA) खाते उघडल्यानंतर लगेच सवलतीसाठी अर्ज करा. यामुळे परीक्षेच्या तारखा निश्चित करणे सोपे जाते.

**२. मॉक टेस्ट्सवर भर:** केवळ पुस्तकी ज्ञान मिळवून चालणार नाही, तर वेळेच्या मर्यादेत उत्तरे कशी द्यायची याचा सराव करणे महत्त्वाचे आहे. ९४% यशस्वी उमेदवार हे नियमित मॉक टेस्ट्स देणारे असतात, हे सिद्ध झाले आहे.

**३. सातत्य:** पूर्णवेळ नोकरी करणाऱ्या वकिलांसाठी दररोजचा थोडा वेळ अभ्यासासाठी देणे हे या ध्येयापर्यंत पोहोचण्याचे गमक आहे.

**४. मार्गदर्शक निवडा:** १५ वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या संस्थांचे मार्गदर्शन घेतल्यास अभ्यासक्रम आणि बदलत्या कायद्याची समज अधिक स्पष्ट होते.

जागतिक वकिलीचे स्वप्न आणि वास्तव आजच्या काळातील वकील हा केवळ न्यायालयीन प्रक्रियेत गुंतलेला नसून तो जागतिक सल्लागार आहे. जेव्हा एखादा भारतीय वकील इंग्लंडची ही पात्रता मिळवतो, तेव्हा तो दोन भिन्न कायदेशीर प्रणालींचा (भारतीय आणि इंग्रजी) मेळ घालणारा एक सक्षम तज्ज्ञ बनतो. ही दुहेरी पात्रता तुम्हाला अशा वकिलांच्या पंक्तीत बसवते, ज्यांची मागणी जगभरातील मोठ्या कॉर्पोरेट संस्थांमध्ये असते.

निष्कर्ष 'सॉलिसिटर ऑफ इंग्लंड अँड वेल्स' होणे ही आता केवळ पाश्चिमात्य देशांतील लोकांसाठी एक स्वप्न राहिलेले नाही. योग्य नियोजन, कठोर मेहनत आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर मानकांची जोड दिल्यास भारतीय वकीलही जागतिक स्तरावर आपली मोहोर उमटवू शकतात. जर तुम्ही तुमच्या करिअरला एक नवी उंची देण्याचा विचार करत असाल, तर हीच ती वेळ आहे. या प्रवासाला सुरुवात करा आणि जागतिक कायदेशीर क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करा.

**टीप:** अधिक माहितीसाठी SRA च्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्या किंवा आपल्या कायदेशीर सल्लागारांशी चर्चा करून आपला अर्ज दाखल करा.

**सॉलिसीटर रामशास्त्री**

# लॉ ऑफ लव्ह? कोर्टाने नाकारली 'संमतीची' सबब!

## पोक्सो कायद्याचा ऐतिहासिक निकाल: रोमँटिक नातेसंबंधांना कायद्यात स्थान नाही , आरोपीला १० वर्षांची सक्तमजुरी,

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने एका महत्त्वाच्या निकालात स्पष्ट केले आहे की, पोक्सो कायद्यांतर्गत १८ वर्षांखालील अल्पवयीन मुलांशी असलेल्या शारीरिक संबंधांमध्ये 'रोमँटिक' किंवा 'प्रेमाचे नाते' हे कोणतेही अपवाद किंवा संरक्षण मानले जाऊ शकत नाही. कायद्याच्या नजरेत १८ वर्षांखालील अल्पवयीन मुलगा किंवा मुलगी संमती देण्यास सक्षम नसतात, त्यामुळे 'संमतीने ठेवलेले संबंध' असा युक्तिवाद पोक्सो कायद्याच्या कक्षेतून सुटका करून घेऊ शकत नाही, असे न्यायालयाने नमूद केले आहे.

ऑगस्ट २०१९ मध्ये जेव्हा पीडित मुलगी ११ वीत शिकत होती, तेव्हा १९ वर्षांच्या आरोपीने तिला लग्नाचे खोटे आश्वासन देऊन शारीरिक संबंध ठेवण्यास प्रवृत्त केले. यातून मुलगी गरोदर राहिली आणि मे २०२० मध्ये तिने एका मुलीला जन्म दिला. आरोपीने लग्नास नकार दिल्याने पीडितेने आत्महत्येचा प्रयत्न केला होता. डीएनए चाचणीत आरोपी हाच त्या मुलीचा जैविक पिता असल्याचे सिद्ध झाले होते.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान, आरोपीच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, हे नाते पूर्णपणे संमतीने होते आणि ते नैसर्गिक आकर्षणातून घडले होते. पोक्सो कायद्याचा वापर अशा किशोरवयीन मुलांमधील संबंधांना शिक्षा देण्यासाठी करू नये. मात्र, न्यायमूर्ती एन. आनंद व्यंकटेश आणि न्यायमूर्ती के. के. रामकृष्णन यांच्या खंडपीठाने हा बचाव फेटाळून लावला.



खंडपीठाने आपल्या आदेशात म्हटले की, "पोक्सो कायदा कोणत्याही रोमँटिक नात्याला अपवाद मानत नाही. कायद्याचा मुख्य उद्देश बालकांचे रक्षण करणे हा आहे. जर न्यायालयाने 'संमती' या मुद्द्याला आधार मानले, तर त्याचे अत्यंत गंभीर परिणाम होतील आणि कायद्याच्या मूळ हेतूची पायमल्ली होईल. १८ वर्षांखालील व्यक्ती कायद्याच्या नजरेत संमती देण्यास असमर्थ असते, त्यामुळे अशा संबंधांना कायद्याचा सामना करावाच लागेल."

खटल्यादरम्यान असा आरोप होता की, आरोपीने जातीवाचक टिप्पणी करत लग्नास नकार दिला होता. मात्र, उच्च न्यायालयाने या आरोपांतून आरोपीची निर्दोष मुक्तता केली. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, हे दोघेही शालेय काळापासून एकमेकांना ओळखत होते. त्यांचे संबंध हे जातीवर आधारित नसून ते केवळ नैसर्गिक आकर्षण होते. त्यामुळे अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्याखालील गुन्हे सिद्ध होत नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले. याशिवाय, पीडितेला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा (IPC ३०६) आरोपही न्यायालयाने फेटाळून लावला.

सुरुवातीला कनिष्ठ न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयाने यात बदल केला. घटनेच्या वेळी आरोपीचे वय केवळ १९ वर्षे होते, हे लक्षात घेता आणि त्या वयातील हार्मोनल बदलांचा विचार करून, न्यायालयाने त्याला जन्मठेपेऐवजी १० वर्षांची सक्तमजुरी आणि ५ हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

# विश्रांतवाडीत 'नक्सलींच्या' गाण्यावर नृत्य?

## विद्यार्थ्यांना पुणे सत्र न्यायालयाचा मोठा दिलासा

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com




सांस्कृतिक कार्यक्रमात युट्यूबवरील एका गाण्यावर नृत्य सादरीकरण केल्याप्रकाने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात अडकलेल्या दोन विद्यार्थ्यांना पुणे सत्र न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. आर. शेट्टी यांनी दोन्ही विद्यार्थ्यांना अटी व शर्तींसह अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य आणि आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन त्यांच्या वतीने वकिलांनी कोणतीही फी न घेता संपूर्ण न्यायालयीन लढा पूर्णपणे विनामूल्य, म्हणजेच 'प्रो बोनो' लढवला.

विश्रांतवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात दोन विद्यार्थ्यांनी एका युट्यूबवरील गाण्यावर नृत्य सादर केले होते. मात्र, सदर गाणे हे कथितरित्या माओवादी नेता हिडमा मडवी याच्या जीवनावर आधारित असल्याचा आरोप करत, यामुळे राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो असा दावा पोलिसांनी केला. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल शब्बीर शेख यांच्या तक्रारीवरून विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या (BNS) संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अटक होण्याच्या भीतीने विद्यार्थ्यांनी सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. अर्जदारांच्या वतीने ॲड. अभिषेक रंधवे, ॲड. श्वेतल वहाणे आणि ॲड. श्रेयश बापते यांनी न्यायालयात बाजू मांडली. बचाव पक्षाच्या वतीने वकिलांनी जोरदार युक्तिवाद करताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की: अर्जदार हे विद्यार्थी असून त्यांचा कोणताही देशविरोधी संदेश प्रसारित करण्याचा किंवा राष्ट्रीय सुरक्षेला बाधा आणण्याचा कोणताही दुर्भावनापूर्ण हेतू नव्हता. केवळ एका युट्यूबवर उपलब्ध असलेल्या गाण्यावर अनवधानाने केलेले नृत्य सादरीकरण हा गुन्हेगारी कट असू शकत नाही. तपास अधिकाऱ्यांनी आधीच फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (आताच्या BNSS) आवश्यक नोटीसचे पालन केले असून, आरोपींची कोणतीही पोलीस कोठडी किंवा प्रत्यक्ष कस्टडी घेण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले आहे.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आणि बचावाचा हेतू प्रामाणिक असल्याचे ग्राह्य धरून, अतिरिक्त सत्र न्यायाधीश डी. आर. शेट्टी यांनी विद्यार्थ्यांना दिलासा दिला. त्यांनी पोलिसांना सहकार्य करण्याच्या आणि तपासात अडथळा न आणण्याच्या अटींवर या विद्यार्थ्यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

# राज्य बार कौन्सिलमध्ये महिला वकिलांसाठी १० टक्के जागा?

## जागा भरण्याच्या बीसीआयच्या प्रस्तावाला सर्वोच्च न्यायालयाची संमती

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

न्यायालयाने राज्य बार कौन्सिलच्या कार्यकारी समित्यांमध्ये महिला वकिलांना ३० टक्के प्रभावी प्रतिनिधित्व मिळावे, या उद्देशाने सर्वोच्च न्यायालयाने पूर्वी दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणी संदर्भातील एका महत्त्वपूर्ण याचिकेवर नुकतीच सुनावणी पार पडली. या सुनावणीदरम्यान बार कौन्सिल ऑफ इंडियाने (BCI) महिला वकिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी एक विशेष प्रस्ताव न्यायालयासमोर मांडला, ज्याला सर्वोच्च न्यायालयाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**काय आहे बीसीआयचा प्रस्ताव?**

राज्य बार कौन्सिलच्या कार्यकारी समित्यांमध्ये महिला वकिलांसाठी १० टक्के 'सह-निवड' (को-ऑप्शन) घटक भरण्याचा प्रस्ताव बीसीआयने दिला आहे. या प्रस्तावानुसार, कौन्सिलच्या निवडणुकीत सर्वाधिक मते मिळवूनही पराभूत झालेल्या



महिला उमेदवारांमधून या जागा भरल्या जाव्यात, असे बीसीआयने सुचवले आहे.

सरन्यायाधीश (CJI) सूर्यकांत आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या प्रस्तावाचे स्वागत करत, हा पर्याय प्रथमदर्शनी "योग्य आणि न्याय्य" वाटत असल्याचे नमूद केले.

**सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे निर्देश**

या प्रस्तावाला प्राथमिक मंजुरी देतानाच, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने बार कौन्सिल ऑफ इंडियाला (BCI) काही महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने म्हटले आहे की, या प्रस्तावाची अंमलबजावणी करण्यापूर्वी बीसीआयने सर्व संबंधित भागधारकांशी सविस्तर चर्चा आणि सल्लामसलत करावी. या चर्चेनंतरच सर्वसमावेशक आणि अंतिम यंत्रणा विकसित करावी, जेणेकरून भविष्यात कोणतीही त्रुटी राहणार नाही.


सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली ही सुनावणी राज्य बार कौन्सिलच्या कार्यकारी समित्यांमध्ये महिला वकिलांना ३० टक्के प्रभावी प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी पूर्वी जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचाच एक भाग आहे. कायदेशीर क्षेत्रात महिलांचा सहभाग आणि निर्णय प्रक्रियेत त्यांचे स्थान मजबूत करण्यासाठी न्यायालय कटिबद्ध असल्याचे यावरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

न्यायालयाच्या या भूमिकेमुळे देशभरातील राज्य बार कौन्सिलच्या निवडणुकांमध्ये आणि व्यवस्थापनात महिला वकिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीयरीत्या वाढणार आहे. निवडणुकीत पराभूत होऊनही सर्वाधिक मते घेणाऱ्या महिला उमेदवारांना कार्यकारी समित्यांमध्ये काम करण्याची संधी मिळाल्यामुळे, कौन्सिलच्या कामकाजात महिलांच्या धोरणात्मक विचारांना योग्य व्यासपीठ मिळेल.

सर्वोच्च न्यायालयाच्या या सकारात्मक दृष्टिकोनामुळे कायदे क्षेत्रातील महिलांच्या हक्कांना आणि समानतेला मोठी बळकटी मिळणार आहे. सर्व भागधारकांशी चर्चा करून बीसीआय लवकरच या संदर्भातील अंतिम नियमावली जाहीर करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नेपाळमधील 'जेन-झी' क्रांती आणि भारताचे भविष्य

## भ्रष्टाचारमुक्तीचा 'नेपाळ पॅटर्न' भारतीय लोकशाहीत आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत क्रांती घडवू शकेल का?



अलीकडच्या काळात भारताचा शेजारी देश असलेल्या नेपाळमध्ये एक मोठा आणि अभूतपूर्व राजकीय बदल दिसून आला आहे. कित्येक दशकांपासून चालत आलेल्या राजशाही आणि घराणेशाहीच्या पारंपारिक चौकटीतून बाहेर पडत, २००८ नंतर नेपाळने स्वतःला 'संघीय लोकशाही प्रजासत्ताक' म्हणून जगासमोर स्थापित केले. मात्र, खऱ्या अर्थाने मोठा बदल आता घडत आहे. नेपाळमध्ये आता तरुण नेते आणि सजग तरुण मतदार देशाच्या शासनाची आणि विकासाची दिशा ठरवत आहेत. या नव्या ऊर्जेमुळे नेपाळच्या राजकीय आणि आर्थिक पटलावर मोठे स्थित्यंतर घडून येत आहे.

या बदलाचा मुख्य केंद्रबिंदू म्हणजे २७ मार्च २०२६ रोजी 'राष्ट्रीय स्वतंत्रता पार्टी'चे तरुण नेते बालेंद्र शाह यांच्या हाती आलेली नेपाळची सत्तासूत्रे! नेपाळमधील प्रस्थापित, संथ आणि भ्रष्ट राजकारणाला थेट धक्का देऊन एक पारदर्शक, डिजिटल आणि प्रगत राष्ट्र निर्माण करणे हा या परिवर्तनाचा मुख्य हेतू आहे. तरुण पिढीच्या, म्हणजेच 'GEN-Z' च्या आक्रोशातून आणि व्यवस्थेवरील अविश्वासामधून उदयाला आलेले बालेंद्र शाह हे "नेपाळ प्रथम" या जहाल राष्ट्रवादी आणि विकासवादी धोरणाचे पुरस्कर्ते आहेत. नेपाळमधील या राजकीय भूकंपाने आता भारतासमोरही काही मूलभूत आणि महत्त्वाचे प्रश्न उभे केले आहेत.

**भारतात तरुण नेतृत्व आले, तर काय बदलेल?**

जर भारतासारख्या महाकाय देशातही तरुणांनी प्रशासनाची आणि शासनाची सूत्रे हाती घेतली, तर देशाच्या रचनेत क्रांतिकारक बदल घडू शकतात. तरुण नेते सामान्यतः पारदर्शकता, आधुनिक नवकल्पना आणि गतिमान कार्यक्षमता यांना सर्वोच्च प्राधान्य देतात.

**जलद निर्णय प्रक्रिया:** तरुण नेतृत्वामुळे लालफितीच्या कारभाराला चाप बसेल, नोकरशाहीतील विनाकारण होणारा विलंब कमी होईल आणि निर्णय वेगाने घेतले जातील.

**पारंपारिक सत्ताकेंद्रांना आव्हान:** तरुण रक्त राजकारणात आल्यास घराणेशाही आणि पारंपारिक सत्ताकेंद्रांना थेट आव्हान मिळेल, ज्यामुळे प्रशासनात उत्तरदायित्व वाढेल.

कायद्यांचे आधुनिकीकरण व गतिमान न्याय: भारतात आजही अनेक कायदे वसाहतकालीन म्हणजेच ब्रिटिश काळातील आहेत. अलीकडेच केंद्र सरकारने जुन्या कायद्यांच्या जागी भारतीय न्यायसंहिता (BNS), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (BNSS) आणि भारतीय साक्ष अधिनियम (BSA) हे नवीन कायदे आणण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. जर देशात तरुण नेतृत्व वाढले, तर आपली न्यायप्रणाली पूर्णपणे डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित होऊ शकते. यामुळे प्रलंबित खटल्यांचा निपटारा जलद गतीने होऊन सामान्य नागरिकाला वेळेत आणि सहज न्याय मिळणे शक्य होईल.

भ्रष्टाचारावर थेट प्रहार: भारतासमोरील सर्वात मोठी समस्या म्हणजे 'भ्रष्टाचार'. नेपाळच्या धर्तीवर भारतातील तरुण नेतृत्व कठोर भ्रष्टाचार विरोधी धोरणांना प्राधान्य देऊ शकते. डिजिटल ट्रॅकिंग, ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि पारदर्शक करप्रणाली यामुळे शासन अधिक स्वच्छ आणि लोकाभिमुख होऊ शकते.

**नेपाळमधील सुधारणा भारतात थेट लागू करणे शक्य आहे का?**

नेपाळमधील हा 'GEN-Z' पॅटर्न अत्यंत प्रभावी वाटत असला, तरी तो थेट भारतात लागू करणे काही आव्हानांमुळे कठीण मानले जाते. भारत हा नेपाळच्या तुलनेत भौगोलिक, राजकीय आणि सामाजिक दृष्टीने प्रचंड मोठा आणि कमालीचा वैविध्यपूर्ण देश आहे. भारताची सुरक्षा यंत्रणा, प्रादेशिक विविधता आणि बळकट लोकशाही रचना यामुळे येथे एका रात्रीत संपूर्ण व्यवस्था बदलणे शक्य नाही.

परंतु, थेट संपूर्ण देशात बदल करण्याऐवजी आपण 'गोवा' सारख्या छोट्या राज्यातून या प्रयोगाची सुरुवात करू शकतो. भारत आणि नेपाळच्या भौगोलिक आणि राजकीय परिस्थितीत फरक असला, तरी गोवा आणि नेपाळमध्ये काही अंशी साम्य आहे:

**पर्यटन हेच मुख्य साधन:** नेपाळमधील पोखराप्रमाणेच गोव्याच्या ग्रामीण भागातही निसर्ग आणि संस्कृतीवर आधारित पर्यटनाला मोठी चालना दिली जाऊ शकते. दोन्ही अर्थव्यवस्था पर्यटनावर अवलंबून आहेत.

**लोकसंख्या आणि संस्कृतीचा फरक:** नेपाळची लोकसंख्या सुमारे तीन कोटी आहे, तर गोव्याची लोकसंख्या अवघी




१५ ते १६ लाख आहे. अर्थात, गोव्याची संस्कृती आणि शिक्षण पद्धती वेगळी आहे. गोवा सध्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) वेगाने लागू करत आहे, तर नेपाळ आपल्या पारंपारिक मूल्यांवर अधिक लक्ष केंद्रित करत आहे. त्यामुळे थेट राजकीय व्यवस्था बदलण्याऐवजी प्रत्येक राज्याच्या विशिष्ट गरजेनुसार सुधारणांचा विचार व्हायला हवा. उदाहरणार्थ, नेपाळसारख्या सुधारणा गोव्यामध्ये करण्यासाठी जर आपल्याला 'पाच पटीने' प्रयत्न करावे लागणार असतील, तर महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान यांसारख्या मोठ्या राज्यांमध्ये त्यांच्या दुप्पट भौगोलिक आकार, संस्कृती, परंपरा आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन विासाची पायाभरणी करावी लागेल.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेचे वास्तव: 'फास्ट मनी' की 'शाश्वत पैसा'?**

आज भारतातील ग्रामीण भागातील तरुण मोठ्या संख्येने शहरांकडे धाव घेत आहेत. शहरांमधील रोजगाराच्या संधींमुळे गावाकडच्या लोकांना फक्त 'जलद पैसा' नव्हे, तर 'शाश्वत पैसा' हवा आहे. ग्रामीण भागातून होणाऱ्या या स्थलांतराची मुख्य कारणे खालीलप्रमाणे आहेत:

- ग्रामीण भागात डिजिटल आणि तंत्रज्ञान क्षेत्राचा विस्तार न होणे.
- स्टार्टअप्स आणि स्थानिक उद्योजकतेला प्रोत्साहन न मिळणे.
- कृषीपूरक उत्पादन क्षेत्राचा विकास न होणे.
- आधुनिक कौशल्यांवर आधारित रोजगार निर्मितीचा अभाव.

सध्या सरकार ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी थेट आर्थिक मदत देते; जसे की खते, बियाणे खरेदीसाठी किंवा कुक्कुटपालनासाठी भांडवल उपलब्ध करून दिले जाते. परंतु, केवळ पैसा देऊन हा प्रश्न सुटणारा नाही.

**नव्या नेतृत्वाची नवी दिशा: अनुदानाऐवजी प्रशिक्षण!**

जर देशातील तरुण नेतृत्वाने धोरणांमध्ये बदल घडवला, तर केवळ थेट रोकड देण्याऐवजी ग्रामीण भागात 'ट्रेनिंग सेंटर' (प्रशिक्षण केंद्रे) सुरू करण्यावर भर दिला जाईल.

**डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर:** ग्रामीण युवकांना डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक शेतीचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**कमी वेळेत अधिक उत्पन्न:** आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कमीत कमी वेळेत आणि उपलब्ध संसाधनांमध्ये अधिक उत्पन्न कसे मिळवावे, याचे ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले पाहिजे.

यामुळे भारत केवळ शेतीप्रधान अर्थव्यवस्थेपर्यंत मर्यादित न राहता, उत्पादन आणि सेवा क्षेत्रातही जागतिक स्तरावर अधिक मजबूत बनेल. भारतातील तरुण नेतृत्वामुळे देशाची जागतिक ओळख बदलू शकते. यामुळे सरकार आणि जनता यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ होईल. भारताने नेपाळच्या या 'तरुण क्रांती'च्या अनुभवातून योग्य ती प्रेरणा घेतली पाहिजे. आपल्या अथांग विविधतेचा आदर करत अधिक पारदर्शक, जबाबदार आणि कार्यक्षम प्रशासन उभारले, तर देशाच्या विकासाला एक नवी आणि आधुनिक गती मिळू शकते. परंतु, हे सर्व स्वप्न साकार करण्यासाठी केवळ घोषणा करून चालणार नाही, तर देशातील प्रशासन, सरकार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सजग नागरिक यांचे सामूहिक योगदानच मैलाचा दगड ठरणार आहे!



कु. श्रीधर संजय तोंडे
बीए एलएलबी-II
(KJEI ट्रिनिटी कॉलेज ऑफ लॉ, पुणे)

## 'केस-स्टॅटस'साठी डिजिटल टच-स्क्रीन किओस्क

अनेकदा पक्षकार आपल्या खटल्याच्या तारखेसाठी लिपिकांकडे चौकशी करतात. प्रशासनाने ठिकठिकाणी 'टच-स्क्रीन किओस्क' बसवावेत, जिथे केस नंबर टाकल्यास तारखेची माहिती त्वरित मिळेल. यामुळे कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी होईल आणि पक्षकारांना त्वरित माहिती मिळेल. ही डिजिटल प्रणाली कामकाजात पारदर्शकता आणेल.

**पक्षकार सुनील वाघ,** हडपसर, पुणे

## रेकॉर्ड रूममध्ये 'ड्युमिडिफायर' यंत्रणा

दमट हवामानामुळे जुन्या कागदपत्रांना बुरशी लागून ती नष्ट होतात. प्रशासनाने रेकॉर्ड रूममध्ये 'ड्युमिडिफायर' (Dehumidifier) यंत्रणा बसवून आर्द्रता नियंत्रित करावी. यामुळे कायदेशीर दस्ताऐवज दशकांनोदशके सुरक्षित राहतील. ऐतिहासिक महत्त्व असलेली ही कागदपत्रे जतन करणे ही न्यायव्यवस्थेची जबाबदारी आहे.

**कोर्ट लिपिक,** शिवाजीनगर, पुणे

## दिव्यांगांसाठी 'ब्रेल-लिपी' मार्गदर्शक नकाशे

दृष्टीहीन वकील किंवा पक्षकारांना न्यायालयीन इमारतींचा नकाशा समजत नाही. प्रशासनाने मुख्य प्रवेशद्वारावर आणि प्रत्येक मजल्यावर 'ब्रेल-लिपी'मधील मार्गदर्शक नकाशे (Tactile Maps) बसवावेत. यामुळे त्यांना स्वतःहून कोर्ट रूमपर्यंत पोहोचणे सोपे होईल. सर्वसमावेशक न्यायव्यवस्था निर्माण करण्यासाठी ही एक अत्यंत संवेदनशील आणि आवश्यक सुधारणा आहे.

**ॲड. प्रज्वल काळे,** ॲडव्होकेट, शिवाजीनगर, पुणे




## कर्मचाऱ्यांसाठी 'हेल्थ चेकअप कॅम्प'

न्यायालयीन कामाच्या तणावामुळे कर्मचाऱ्यांना अनेक आरोग्य समस्या असतात. प्रशासनाने वर्षातून दोनदा 'मोफत आरोग्य तपासणी शिबिर' आयोजित करावे. कर्मचाऱ्यांचे आरोग्य निरोगी असल्यास कामाचा दर्जा आपोआप सुधारेल आणि न्यायालयीन कामात विलंब होणार नाही.

**कोर्ट लिपिक,** शिवाजीनगर, पुणे

## वकिलांसाठी 'डिस्काउंटेड बुकशॉप'

न्यायालय परिसरात कायद्याची अद्ययावत पुस्तके मिळण्यासाठी एक अधिकृत 'डिस्काउंटेड बुकशॉप' असावे. नवीन वकिलांना महागडी पुस्तके विकत घेणे कठीण जाते, त्यामुळे प्रशासनाने प्रकाशकांशी करार करून सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. दर्जेदार साहित्यामुळे कायद्याचा अभ्यास अधिक सखोल होईल.

**ॲड. विकास मोहिते,** ॲडव्होकेट, सदाशिव पेठ, पुणे

## पार्किंगमध्ये 'इलेक्ट्रिक व्हेईकल चार्जिंग' पॉइंट

वाढत्या ई-वाहनांच्या संख्येचा विचार करून प्रशासनाने पार्किंगमध्ये 'ईव्ही चार्जिंग' पॉईंट्स उपलब्ध करून द्यावेत. वकिलांच्या आणि पक्षकारांच्या गाड्या चार्जिंगवर लावून ते शांतपणे आपले काम पूर्ण करू शकतील. भविष्यातील गरजा लक्षात घेऊन केलेली ही सुधारणा पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी पूरक ठरेल.

**ॲड. नेहा कुलकर्णी,** ॲडव्होकेट, बाणेर, पुणे

## 'ग्रीन लॉन' आणि बसण्याची व्यवस्था

न्यायालयात पक्षकारांना तासनतास थांबावे लागते, पण बसण्यासाठी पुरेशी मोकळी जागा नाही. प्रशासनाने रिकाम्या जागी 'ग्रीन लॉन' तयार करून तिथे बाकडी टाकावीत. झाडे आणि बसण्याची सोय असल्यास न्यायालयीन परिसरातील तणावपूर्ण वातावरण थोडे प्रसन्न होईल. सुरक्षित आणि शांत परिसरात न्यायदान प्रक्रियेला अधिक सकारात्मक दिशा मिळेल.

**सामाजिक कार्यकर्ता समीर फडणीस,** बिबवेवाडी, पुणे

## कोर्ट रूममध्ये 'नॉइज कॅन्सलिंग' पॅनेल्स

न्यायालयात एकाच वेळी अनेक कामे सुरू असल्याने खूप गोंधळ होतो, ज्यामुळे न्यायाधीशांना युक्तिवाद ऐकताना त्रास होतो. प्रशासनाने कोर्ट रूमच्या भिंतींवर 'नॉइज कॅन्सलिंग' (ध्वनीशोषक) पॅनेल्स लावावेत. यामुळे बाहेरील आवाज कमी होऊन कोर्टातील कामकाजात एकाग्रता वाढेल. शांत वातावरण हे न्यायदानासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**निवृत्त न्यायाधीश,** मॉडेल कॉलनी, पुणे

## न्यायालयासाठी 'विशेष बस सेवा'

पुणे न्यायालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत सार्वजनिक बससेवा अपुरी असल्याने पक्षकार आणि कर्मचाऱ्यांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे वाहतूक कोंडी वाढते. प्रशासनाने पीएमपीएल (PMPML) प्रशासनाशी समन्वय साधून प्रमुख उपनगरांतून (उदा. कोथरूड, हडपसर, कात्रज) न्यायालयापर्यंत सकाळी आणि संध्याकाळी विशेष 'कोर्ट शटल' बस सुरू कराव्यात. यामुळे सामान्य पक्षकारांचा प्रवास स्वस्त, सुरक्षित आणि वेळेत होईल.

**सामाजिक कार्यकर्ता समीर कुलकर्णी,** रायकर नगर, धायरी, पुणे



वाचकांनी आपली पत्रे punebarandbench@gmail.com वर पाठवावीत किंवा, संपादक, पुणे बार अँड बेंच, ऑफिस नं. ७, पहिला मजला, चुनावाला चेंबर्स, शिक्षण मंडळाशेजारी, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे ५ या पत्त्यावर पाठवावीत.



# प्रभावी लीगल ड्राफ्ट : हे नियम पाळाच!

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

कायदा क्षेत्रात युक्तिवाद जितका महत्त्वाचा असतो, तितकेच महत्त्व न्यायालयीन मसुदा लेखनाला (लीगल राइटिंग ) असते. एखादी याचिका, नोटीस किंवा कराराचा मसुदा जितका स्पष्ट असेल, तितका पक्षकाराला न्याय मिळण्याचा मार्ग सुकर होतो. सामान्य व्यावसायिक संवादातून कायदे क्षेत्रासाठी अंगीकृत केलेली '७ तत्त्वे प्रभावी कायदेशीर लेखनाचा पाया मानली जातात. वकील, कायद्याचे विद्यार्थी आणि संशोधकांसाठी ही तत्त्वे मार्गदर्शक ठरणारी आहेत.



**स्पष्टता (Clarity)**

कायदेशीर मसुद्याचा अर्थ वाचकाला पहिल्याच वाचनात सहज समजला पाहिजे. न्यायाधीशांना किंवा पक्षकारांना वाक्याचा अर्थ शोधण्यासाठी कसरत करावी लागू नये. यासाठी मसुद्यात जुनाट, क्लिष्ट कायदेशीर शब्दांचा (Legalese) भडिमार टाळून सोपी रचना करावी. वाक्यांमध्ये 'ॲक्टिव्ह व्हॉईस'चा वापर केल्यास लेखनात स्पष्टता येते.

**संक्षिप्तता (Conciseness)**

न्यायालयाचा आणि वाचकाचा वेळ अत्यंत मौल्यवान असतो, त्यामुळे मसुदा पाल्हाळिक नसावा. मुख्य मुद्द्यावर थेट येणे आवश्यक आहे. लेखनातील अनावश्यक शब्द आणि पुनरावृत्ती टाळावी. उदाहरणार्थ, "Null and void" ऐवजी केवळ "Void" हा एकच शब्द वापरल्यास वाक्य लहान आणि अर्थपूर्ण होते. संक्षिप्त आणि अचूक लिहिलेले युक्तिवाद न्यायाधीशांचे लक्ष वेधून घेतात.

**अचूकता (Correctness)**

कायदेशीर लेखनात व्याकरण, शुद्धलेखन आणि कायद्याच्या कलमांची अचूकता अत्यंत महत्त्वाची असते. एक छोटीशी चूक किंवा चुकीचा संदर्भ संपूर्ण केसचे नुकसान करू शकतो. सादर केलेले तथ्य आणि संदर्भ (सायटेशन ) वर्तमान कायद्यानुसार अचूक आहेत की नाही, याची खात्री मसुदा सादर करण्यापूर्वी दोनदा करणे बंधनकारक आहे.

**ठोसपणा (Concreteness)**

कायदेशीर लेखनात संदिग्ध विधाने किंवा गृहीतके मांडण्याऐवजी ठोस आणि विशिष्ट तपशील द्यावेत. "प्रतिवाद्याने प्रकल्पाला खूप उशीर केला," असे लिहिण्याऐवजी "प्रतिवाद्याने १ ऑक्टोबरची मुदत चुकवून प्रकल्प ४२ दिवस लांबवला," असा निश्चित आणि मोजता येणारा तपशील देणे अधिक प्रभावी ठरते.

**विचारशीलता आणि वाचक भान (Considerate)**

आपला मसुदा किंवा पत्र नक्की कोण वाचणार आहे, याचे भान लेखकाला असावे लागते. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींसाठी लिहिला जाणारा युक्तिवाद आणि सामान्य पक्षकाराला कायदेशीर सल्ला देण्यासाठी लिहिलेले पत्र, या दोन्हींची भाषा आणि पातळी वेगवेगळी असावी लागते. वाचकाच्या गरजेनुसार भाषेची निवड करणे हे यशस्वी वकिलीचे लक्षण आहे.

**परिपूर्णता (Completeness)**

मसुद्यामध्ये संबंधित प्रकरणाशी निगडित सर्व आवश्यक तथ्ये, कायदे आणि विश्लेषणाचा समावेश असावा. अपूर्ण माहितीमुळे न्यायालयात बाजू लंगडी पडू शकते. कोण, काय, कधी, कुठे आणि का, या सर्व मूलभूत प्रश्नांची उत्तरे मसुद्यातून मिळाली पाहिजेत. विरोधी पक्षाच्या संभाव्य युक्तिवादांचा अंदाज घेऊन त्यानुसार मसुदा परिपूर्ण करावा.

**सौजन्यशीलता (Courteous)**

कायदेशीर लढाई कितीही तीव्र असली, तरी मसुद्यातील भाषा नेहमी व्यावसायिक, आदरयुक्त आणि वस्तुनिष्ठ असावी. विरोधी पक्षावर वैयक्तिक टीका करणे किंवा आक्रमक, भावनाप्रधान भाषेचा वापर करणे टाळावे. कायद्याच्या चौकटीत राहून केवळ तथ्ये आणि पुराव्यांच्या जोरावर आपली बाजू मांडल्यास मसुद्याचे गांभीर्य आणि वजन वाढते. थोडक्यात, न्यायालयीन कामकाजात मसुदा लेखन हे केवळ एक काम नसून ती एक कला आहे. या ७ नियमांचा अंगीकार केल्यास कायदेशीर मसुदा अधिक प्रभावी, विश्वासार्ह आणि परिणामकारक बनतो, यात शंका नाही.

# 'शेअर्ड ऑटो' म्हणजे कार्यालय नव्हे!

## पॉश कायद्यांतर्गत मुंबई उच्च न्यायालयाचा बँक कर्मचाऱ्याला मोठा दिलासा, प्रवासादरम्यानच्या घटनेवर अंतर्गत समितीला आयसी कारवाईचा अधिकार नाही

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

कामाच्या ठिकाणच्या महिलांच्या लैंगिक छळवणुकीविरुद्ध प्रतिबंध मनाई आणि निवारण कायद्याबाबत पॉश ॲक्ट मुंबई उच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मार्गदर्शक निकाल दिला आहे. कर्मचाऱ्याने स्वतःच्या इच्छेने प्रवास केलेली शेअर्ड रिक्षा ही पॉश कायद्यांतर्गत कामाचे ठिकाण या व्याख्येत येत नाही, असा स्पष्ट निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. या तांत्रिक मुद्द्याच्या आधारे, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एसबीआय एका पुरुष कर्मचाऱ्याला दोषी ठरवणारा अंतर्गत समितीचा आदेश उच्च न्यायालयाने रद्द केला असून संबंधित कर्मचाऱ्याला मोठा दिलासा दिला आहे.



न्यायाधीश सुमन श्याम आणि न्यायाधीश फिरदोष पूनीवाला यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की अंतर्गत समितीला अशा प्रकरणांची चौकशी करण्याचा अधिकार तभीच असतो, जेव्हा कथित घटना कायद्यानुसार कामाच्या ठिकाणी घडलेली असते.

हे प्रकरण स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये गेल्या १४ वर्षांपासून कार्यरत असलेले कर्मचारी सिद्धेश सातपुते यांच्याशी संबंधित आहे. एका महिलेने केलेल्या तक्रारीनुसार २४ मार्च २०२३ रोजी कुर्ला स्टेशन ते वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स बीकेसी दरम्यान शेअर्ड ऑटोने प्रवास करत असताना सिद्धेश यांनी तिला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला होता. सिद्धेश यांनी हा आरोप पूर्णपणे फेटाळून लावला होता आणि प्रवासादरम्यान गर्दीमुळे केवळ हात घासल्याचे म्हटले होते. मात्र ऑगस्ट २०२३ मध्ये एसबीआयच्या अंतर्गत समितीने सिद्धेश यांना लैंगिक छळप्रकरणी दोषी ठरवले होते. या कारवाईला सातपुते यांनी वकील आनंद पांडे आणि शोभित शुक्ला यांच्यामार्फत उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

या प्रकरणावर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने लैंगिक छळवणुकीचा आरोप खरा की खोटा, या मेरिटवर भाष्य करणे टाळले. मात्र अंतर्गत समितीच्या अधिकार क्षेत्रावर बोट ठेवले. न्यायालयाने म्हटले की पॉश कायद्यानुसार अंतर्गत समिती केवळ कामाच्या ठिकाणी घडलेल्या घटनांचीच दखल घेऊ शकते. या प्रकरणात जरी बँक कर्मचारी कार्यालयात जात होता, तरीही ती ऑटो रिक्षा बँक किंवा तक्रारदार महिलेच्या कंपनीकडून पुरवण्यात आलेली नव्हती. कर्मचाऱ्याने स्वतःच्या सोयीसाठी ती निवडली होती.

न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट नमूद केले की अशा परिस्थितीत नियोयाने न पुरवलेली वाहतूक व्यवस्था कामाचे ठिकाण या व्याख्येत येऊ शकत नाही. त्यामुळे अंतर्गत समितीला या प्रकरणावर निर्णय देण्याचा कायदेशीर अधिकार नव्हता. २९ ऑगस्ट २०२३ चा समितीचा आदेश कायद्याच्या चौकटीत टिकणारा नसल्याने तो रद्द करण्यात येत आहे.

या निकालादरम्यान खंडपीठाने सर्व संस्थांच्या अंतर्गत समित्यांसाठी एक महत्त्वाचा नियम अधोरेखित केला. न्यायालयाने सांगितले की कोणत्याही लैंगिक छळाच्या तक्रारीवर पूर्ण चौकशी सुरू करण्यापूर्वी अंतर्गत समितीने प्रथम ही घटना त्यांच्या अधिकार क्षेत्रात येते की नाही, याचा निर्णय घेणे आवश्यक आहे.

उच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की त्यांनी केवळ तांत्रिक आणि अधिकार क्षेत्राच्या मुद्द्यावर हा निर्णय दिला असून रिक्षात छळ झाला की नाही या मूळ वादाची चौकशी केलेली नाही. त्यामुळे तक्रारदार महिला किंवा संबंधित बाजू या घटनेबाबत योग्य त्या इतर कायदेशीर मंचावर जसे की पोलीस ठाणे किंवा फौजदारी न्यायालय दाद मागू शकतात, तो मार्ग कायद्यानुसार मोकळा ठेवण्यात आला आहे.

या खटल्यात बँकेच्या वतीने वकील अभिजित जोशी, वर्षा सावंत, वरद शिरसीकर आणि सौरव सोमाणी यांनी बाजू मांडली. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे पॉश कायद्यांतर्गत वर्कप्लेस म्हणजेच कामाचे ठिकाण या संकल्पनेची व्याप्ती अधिक स्पष्ट झाली आहे. ■■■

# बनावट वकिलांचे रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी 'आधार लिंक'

## बार असोसिएशनची सर्वोच्च न्यायालयात धाव, देशभरातील सर्व वकिलांची माहिती एकाच छताखाली आणण्यासाठी 'राष्ट्रीय डिजिटल नोंदणी' सुरू करण्याची मागणी


पुणे बार अँड बेंच टीम

punebarandbench@gmail.com


देशातील न्यायव्यवस्थेला पोखरणाऱ्या बनावट वकिलांच्या वाढत्या सुळसुळाटाच्या संकटाला आळा घालण्यासाठी आणि वकिली व्यवसायाची घसरलेली विश्वासार्हता पुन्हा मिळवून देण्यासाठी 'बार असोसिएशन ऑफ इंडिया'ने सर्वोच्च न्यायालयात एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी याचिका दाखल केली आहे. या याचिकेद्वारे देशभरातील वकिलांसाठी 'आधार' कार्डच्या धर्तीवर एक केंद्रीकृत आणि तंत्रज्ञानावर आधारित 'राष्ट्रीय डिजिटल नोंदणी' पद्धत सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे कोणत्याही वकिलाची शैक्षणिक पात्रता, त्यांची खरी नोंदणी आणि त्यांचा पूर्वेतिहास अवघ्या काही सेकंदांत तपासणे शक्य होणार आहे.




या ऐतिहासिक याचिकेवर सुनावणी करताना सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हा एक अभिनव आणि अत्यंत आवश्यक असलेला सुधारणावादी प्रस्ताव असल्याचे म्हटले आहे. मात्र, याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यापूर्वी अनेक कायदेशीर आणि तांत्रिक आव्हानांचा सामना करावा लागेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. "हा प्रस्ताव नक्कीच कौतुकास्पद आहे, परंतु यासाठी देशातील सर्व विधी विद्यापीठांना या खटल्यात पक्षकार करावे लागेल. जोपर्यंत ही विद्यापीठे त्यांच्याकडून पदवी घेतलेल्या खऱ्या आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांची माहिती अधिकृतपणे जाहीर करत नाहीत, तोपर्यंत ही प्रणाली पूर्ण होऊ शकत नाही," असे मत सरन्यायाधीशांनी नोंदवले.

बार असोसिएशनने आपल्या याचिकेत देशातील सध्याच्या वकिली नोंदणी व्यवस्थेतील गंभीर त्रुटींवर सविस्तर बोट ठेवले आहे. सध्या देशात एकूण तेवीस राज्य बार कौन्सिल कार्यरत आहेत. मात्र, या सर्व संस्था स्वायत्त असल्यामुळे त्यांच्याकडे वकिलांची तात्काळ माहिती तपासण्यासाठी कोणतीही मध्यवर्ती आणि डिजिटल यंत्रणा उपलब्ध नाही. राज्या-राज्यांमधील या समन्वयाच्या अभावामुळे एखादा पक्षकार, न्यायालय, पोलीस किंवा तपास यंत्रणेला संबंधित व्यक्ती खरोखरच अधिकृत वकील आहे की नाही, हे तपासणे अत्यंत कठीण जाते. याच प्रशासकीय शिथिलतेचा गैरफायदा घेऊन हजारो बनावट व्यक्ती कायद्याची कोणतीही पदवी नसताना न्यायालयात वकील म्हणून वावरत आहेत आणि अशिक्षित पक्षकारांची फसवणूक करत आहेत, असा खळबळजनक दावा याचिकेत करण्यात आला आहे.

याचिकेत केवळ बनावट वकिलांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आलेली नाही, तर सध्याच्या काळात सोशल मीडियाचा गैरवापर करणाऱ्या वकिलांच्या वर्तनावरही कडक नियंत्रण आणण्याची मागणी केली आहे. अनेक व्यक्ती सोशल मीडियावर स्वतःला वकील म्हणून सादर करून चुकीची माहिती पसरवतात, न्यायाधीशांबद्दल आणि न्यायव्यवस्थेबद्दल आक्षेपार्ह विधाने करतात, तसेच स्वतःची दिशाभूल करणारी जाहिरात करून पक्षकारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात. या सर्व प्रकारांमुळे सामान्य जनतेचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास उडू लागला आहे. म्हणूनच, वकिलांसाठी एक कडक सोशल मीडिया आचारसंहिता लागू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी असोसिएशनचे अध्यक्ष प्रशांत कुमार आणि वकील विपीन नायर यांनी न्यायालयासमोर केली.

सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी तरुण वकिलांच्या समस्यांवरही भाष्य केले. ते म्हणाले की, "आपल्या बार कौन्सिलमध्ये अनेक तरुण आणि हुशार वकील सामील होत आहेत. त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी त्यांना योग्य प्रशिक्षण देणे आणि न्यायालयांमध्ये त्यांना हक्काची जागा मिळवून देणे गरजेचे आहे. जर आपण त्यांना मुख्य प्रवाहात आणले नाही, तर असे प्रश्न निर्माण होत राहतील."

या प्रकरणाच्या सखोल आणि सर्वांगीण अभ्यासासाठी सर्वोच्च न्यायालय अब एक नवीन उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्याची शक्यता आहे. न्यायालयाच्या उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर पहिल्याच सोमवारी या प्रकरणावर पुढील विस्तृत सुनावणी घेतली जाणार असून, संपूर्ण देशातील कायदेतज्ज्ञांचे या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

# 'द न्यू इंडियन एक्सप्रेस' नावाच्या वापरावर निर्बंध

## मुंबई उच्च न्यायालयाकडून अंतरिम आदेश कायम


पुणे बार अँड बेंच टीम

punebarandbench@gmail.com


द न्यू इंडियन एक्सप्रेस'या नावाचा वापर दक्षिण भारताबाहेरील राज्यांमध्ये करण्यास 'एक्सप्रेस पब्लिकेशन (मदुराई) प्रायव्हेट लिमिटेड'ला मनाई करणारा अंतरिम आदेश मुंबई उच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने या प्रकरणात महत्त्वाचा निर्णय दिला. यापूर्वी एकल न्यायमूर्तींनी दिलेल्या आदेशात कोणतीही चूक किंवा विसंगती नाही, असे स्पष्ट करत खंडपीठाने या नावाच्या वापरावर घालण्यात आलेली बंदी योग्य ठरवली आहे.

हा संपूर्ण वाद ट्रेडमार्क (व्यापारी चिन्ह) आणि भौगोलिक क्षेत्राधिकार यावरून सुरू आहे. मूळ इंडियन एक्सप्रेस समूहाच्या अंतर्गत झालेल्या करारांनुसार, विशिष्ट वृत्तपत्रांच्या नावांचे हक्क भौगोलिक क्षेत्रांनुसार विभागून देण्यात आले होते. एक्सप्रेस पब्लिकेशन (मदुराई) कंपनीला केवळ दक्षिण भारतातील राज्यांमध्येच हे नाव वापरण्याची परवानगी देण्यात आली होती, असा आक्षेप घेण्यात आला होता. मात्र, कंपनीने या मर्यादेचे उल्लंघन करून इतर राज्यांमध्येही या नावाने व्यवसाय किंवा प्रसार सुरू करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले.

THE NEW INDIAN EXPRESS

याप्रकरणी आधी एकल न्यायमूर्तींनी सुनावणी करताना 'प्रथमदर्शनी' ट्रेडमार्कचे उल्लंघन होत असल्याचे मान्य केले होते आणि मदुराई समूहाला दक्षिण भारताबाहेर हे नाव वापरण्यास तात्पुरती बंदी घातली होती. या निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेले अपील आता खंडपीठाने फेटाळून लावले आहे. खंडपीठाने स्पष्ट केले की, तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आलेला हा मनाई हुकूम कायदेशीरदृष्ट्या योग्य असून, अंतिम सुनावणी होईपर्यंत एक्सप्रेस पब्लिकेशनला दक्षिण भारताबाहेर या शीर्षकाचा वापर करता येणार नाही.

या कायदेशीर लढाईमुळे माध्यम जगतात आणि विशेषतः व्यावसायिक करारांच्या आणि ट्रेडमार्क कायद्यांच्या अंमलबजावणीच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. दोन्ही बाजूंच्या करारांचे स्वरूप आणि हक्कांची व्याप्ती लक्षात घेता, भविष्यातील अंतिम निकालाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रेस्टॉरंटचा १५१ रुपयांचा 'सर्व्हिस चार्ज'


## बेकायदेशीर सेवा शुल्क वसूल करणाऱ्या रेस्टॉरंटला जालंधर ग्राहक मंचाचा १५,००० रुपयांचा दंड


पुणे बार अँड बेंच टीम

punebarandbench@gmail.com


हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेल्यावर बिलामध्ये परस्पर जोडल्या जाणाऱ्या सेवा शुल्काविरोधात (सर्व्हिस चार्ज) एका वकिलाने दिलेल्या कायदेशीर लढ्याला मोठे यश आले आहे. जालंधर येथील जिल्हा ग्राहक विवाद निवारण मंचाने एका रेस्टॉरंटला ग्राहकाच्या संमतीशिवाय सक्तीने सेवा शुल्क आकारल्याबद्दल दोषी ठरवले आहे. हा प्रकार अनुचित व्यापारी प्रथा (अनफेअर ट्रेड प्रॅक्टिस) असल्याचे स्पष्ट करत, ग्राहक मंचाने संबंधित रेस्टॉरंटला तक्रारदार वकिलाला १५,००० रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

संजीव दुग्गल असे या प्रकरणातील तक्रारदार वकिलाचे नाव आहे. ते जालंधरमधील एका प्रसिद्ध रेस्टॉरंटमध्ये जेवण्यासाठी गेले होते. जेवण झाल्यानंतर त्यांना मिळालेल्या बिलामध्ये हॉटेल प्रशासनाने त्यांच्या संमतीशिवाय १५१ रुपये सेवा शुल्क समाविष्ट केले होते. दुग्गल यांनी या अनिवार्य शुल्काला तात्काळ आक्षेप घेतला आणि हे शुल्क हटवण्याची मागणी केली. मात्र, रेस्टॉरंट प्रशासनाने ते देण्यास भाग पाडले. या अन्यायाविरुद्ध त्यांनी थेट जिल्हा ग्राहक मंचाकडे दाद मागितली.




या प्रकरणावर सुनावणी करताना जिल्हा ग्राहक मंचाने रेस्टॉरंट प्रशासनाला चांगलेच फटकारले. मंचाने स्पष्ट केले की, हॉटेल किंवा रेस्टॉरंट ग्राहकांवर कोणत्याही प्रकारचे सेवा शुल्क जबरदस्तीने लादू शकत नाहीत. हे शुल्क पूर्णपणे ऐच्छिक असून, ते द्यायचे की नाही, याचा संपूर्ण अधिकार ग्राहकाचा आहे. ग्राहकाच्या पूर्वसंमतीशिवाय बिलात अशी रक्कम जोडणे हा ग्राहकांच्या हक्कांवर गदा आणणारा प्रकार आहे. या मानसिक त्रासाबद्दल आणि निष्काळजीपणाबद्दल न्यायालयाने हॉटेलला १५,००० रुपये नुकसानभरपाई आणि कायदेशीर खर्चापोटी अतिरिक्त रक्कम देण्याचे आदेश दिले.

या कायदेशीर लढ्यामुळे आता सर्वसामान्य ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला असून, हॉटेलमध्ये बिलाची नीट तपासणी करणे किती गरजेचे आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. जर कोणत्याही हॉटेलने तुमच्या इच्छेविरुद्ध सर्व्हिस चार्ज वसूल केला, तर ग्राहक न्यायालयात धाव घेऊन त्यांच्यावर अशीच कडक कारवाई करता येऊ शकते, असा संदेश या निकालातून गेला आहे.

# एआय-ड्रिव्हन लॉयर': भविष्यातील बदलांसाठी प्रभावी मार्गदर्शक

तंत्रज्ञानाच्या वेगाने होणाऱ्या बदलांमुळे आज प्रत्येक क्षेत्रात 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' (AI) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव वाढू लागला आहे. कायदेशीर क्षेत्रही याला अपवाद नाही. वकील आणि लॉ फर्म्सना या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यास मदत करण्यासाठी चिराग कंसारा यांचे 'द एआय-ड्रिव्हन लॉयर: अर्डॅप्टिंग टू आर्टिफिशिअल इंटेलिजन्स इन द लीगल प्रोफेशन' हे पुस्तक एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.




कायदेशीर व्यवसायात एआयची क्रांती एआय केवळ भविष्यातील कल्पना नसून, ती आजच्या काळातील एक गरज बनली आहे. हे पुस्तक वकिलांना एआयचा जबाबदार आणि प्रभावी वापर कसा करायचा, याचे व्यावहारिक मार्गदर्शन देते. चिराग कंसारा यांनी या पुस्तकात एआयच्या वापरामुळे कायद्याच्या कामात येणारी कार्यक्षमता, अचूकता आणि नाविन्यपूर्ण बदल यावर सविस्तर चर्चा केली आहे.

**पुस्तकातील काही प्रमुख पैलू:**

**संशोधन आणि दस्तऐवजीकरण:** एआयच्या मदतीने कायदेशीर संशोधन जलद करणे आणि कागदपत्रांचे पुनरावलोकन स्वयंचलित पद्धतीने कसे करावे, हे यात स्पष्ट केले आहे.

**अशिल सेवा आणि निकालांचा अंदाज:** ग्राहकांना अधिक चांगली सेवा कशी देता येईल आणि एआयच्या मदतीने केसच्या संभाव्य निकालांचा अंदाज कसा लावता येईल, यावर यात प्रकाश टाकण्यात आला आहे.

**नैतिक मार्गदर्शक तत्त्वे:** तंत्रज्ञानाचा वापर करताना कायदेशीर नीतिमत्ता कशी जपावी, याबाबत लेखकाने सविस्तर मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत.

**व्यावहारिक केस स्टडीज:** केवळ सिद्धांतावर न थांबता, पुस्तकात वास्तविक आयुष्यातील उदाहरणे आणि केस स्टडीजचा समावेश करण्यात आला आहे.


**भविष्याचा रोडमॅप:** कायदेशीर व्यावसायिक आणि लॉ फर्म्सना एआयच्या जगात नेतृत्व करण्यासाठी आवश्यक असलेली 'स्टेप-बाय-स्टेप' रणनीती यात दिली आहे.

कोणासाठी उपयुक्त? हे पुस्तक वकील, लॉ फर्मचे भागीदार आणि लीगल ऑपरेशन्समध्ये काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी एक अनमोल साधन आहे. जर तुम्हाला कायदेशीर क्षेत्रातील या नवीन तंत्रज्ञान-युगात स्वतःला अद्ययावत ठेवायचे असेल, तर हे पुस्तक तुम्हाला एआय आत्मविश्वासाने स्वीकारण्यास आणि त्याचा आपल्या सरावात प्रभावी वापर करण्यास सक्षम करेल.

कायद्याची जाण आणि तंत्रज्ञानाची साथ मिळाल्यास, वकिलीचा व्यवसाय अधिक सक्षम आणि ग्राहकांसाठी विश्वासार्ह बनेल, असा विश्वास हे पुस्तक व्यक्त करते.

# लीगल ड्राफ्टिंग : प्रभावी 'कायदेशीर मसुदा लेखन'

कायदेशीर व्यवसायात 'मसुदा लेखन' हे (लीगल ड्राफ्टिंग) केवळ कौशल्य नसून ते एक प्रभावी शस्त्र आहे. एखाद्या वकिलाची बुद्धिमत्ता आणि तर्कशक्ती त्याच्या लेखनातूनच दिसून येते. या महत्त्वाच्या विषयावर कुशाग्र 'वाइट्समॅन' (WHITESMANN) प्रकाशनाद्वारे प्रकाशित झालेले कुश कालरा यांचे 'लीगल ड्राफ्टिंग (कॉम्प्रिहेन्सिव्ह गाईड टू बिकम सक्सेसफुल लीगल प्रोफेशनल्स) बेस्ड ऑन न्यू क्रिमिनल लॉज' (२०२५ आवृत्ती) हे पुस्तक नवोदित वकिलांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.




बदलत्या कायद्यांचा सखोल अभ्यास भारतीय न्यायव्यवस्थेत नुकतेच नवीन फौजदारी कायदे (भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम) लागू झाले आहेत. या बदलत्या कायदेशीर चौकटीत वकिलांनी आपले मसुदा लेखन कसे अद्ययावत ठेवावे, याचे सविस्तर मार्गदर्शन या पुस्तकात देण्यात आले आहे. जुन्या आणि नवीन तरतुदींमधील फरक समजून घेऊन, त्यानुसार मसुदे कसे तयार करावेत, हे लेखकाने अतिशय सोप्या पद्धतीने स्पष्ट केले आहे.

**पुस्तकाची प्रमुख वैशिष्ट्ये: नवीन कायद्यांशी सुसंगत:** २०२५ ची ही नवीन आवृत्ती पूर्णपणे नवीन फौजदारी कायद्यांवर आधारित आहे, ज्यामुळे वाचकांना ताज्या कायदेशीर बदलांची माहिती मिळते.

**व्यावसायिक यशाची गुरुकिल्ली:** केवळ कायदेच नव्हे, तर एक यशस्वी कायदेशीर व्यावसायिक (LEGAL PROFESSIONAL) बनण्यासाठी लागणारी कौशल्ये, भाषेची अचूकता आणि मांडणीची पद्धत यावर पुस्तकात भर दिला आहे.

**सर्वसमावेशक मांडणी:** हे पुस्तक केवळ एक मार्गदर्शिका नसून ते एक कार्यशाळा असल्यासारखे आहे. विविध प्रकारचे कायदेशीर मसुदे, त्यांचे फॉरमॅट्स आणि ते तयार करताना घ्यावयाची खबरदारी यावर यात सविस्तर चर्चा केली आहे.

**व्यावहारिक दृष्टिकोन:** कायदेशीर मसुदा लेखनात होणाऱ्या सामान्य चुका टाळून, प्रभाव पाडणारे दस्तऐवज कसे तयार करावेत, याचे उत्तम नमुने यात दिले आहेत.

कोणासाठी उपयुक्त? हे पुस्तक प्रामुख्याने कायद्याचे विद्यार्थी, इंटर्न्स, ज्युनिअर वकील आणि कायदेशीर मसुदा लेखनात प्राविण्य मिळवू इच्छिणाऱ्या सर्वांसाठी अत्यंत मोलाचे आहे. कोर्टाच्या पायरीवर उभे असताना आपल्या मसुद्यातून न्यायाधीशांना प्रभावित करणे आणि अशिलांना योग्य न्याय मिळवून देणे, यासाठी हे पुस्तक एक भक्कम आधार ठरेल.

कायदेशीर व्यवसायात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी अचूक मसुदा लेखनाची जोड आवश्यक आहे. कुश कालरा यांचे हे पुस्तक या प्रवासात नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

# बिझनेस लॉ : सर्वसमावेशक मार्गदर्शक

वाणिज्य शाखेच्या पदवी अभ्यासक्रमात 'व्यावसायिक कायदा' हा विषय पायाभूत मानला जातो. विशेषतः कलकत्ता विद्यापीठाच्या बी.कॉम (B.COM) प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी सुजित कुमार दास आणि पंकज कुमार रॉय यांनी लिहिलेले 'बिझनेस लॉ, फर्स्ट एडिशन' हे पुस्तक अभ्यासासाठी एक महत्त्वपूर्ण साधन ठरत आहे.

कायदेशीर संकल्पनांची सखोल ओळख व्यावसायिक जगतातील विविध कायदे समजून घेणे ही केवळ परीक्षेत उत्तीर्ण होण्याची गरज नसून, ती एक व्यावसायिक कौशल्य आहे. हे पुस्तक भारतीय करार कायदा (१८७२) पासून ते ग्राहक संरक्षण कायद्यापर्यंत (१९८६) अनेक महत्त्वाच्या कायद्यांचा सविस्तर आढावा घेते.

**पुस्तकातील प्रमुख घटक:**

हे पुस्तक खालील कायदेशीर तरतुदींचे सखोल विश्लेषण करते:

**भारतीय करार कायदा (१८७२):** ऑफर, स्वीकृती, कराराची क्षमता आणि वैध करार.


**माल विक्री कायदा (१९३०):** अटी आणि हमी, मालकी हक्काचे हस्तांतरण.

**भारतीय भागीदारी कायदा (१९३२):** भागीदारीचे प्रकार, नोंदणी आणि भागीदारांचे अधिकार.

**मर्यादित दायित्व भागीदारी कायदा (२००८):** नवीन काळातील एलएलपी (LLP) संरचनेची माहिती.

**नेगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट (१८८१):** धनादेश, हुंड्या आणि त्यांचे कायदेशीर पैलू.

**ग्राहक संरक्षण कायदा (१९८६):** तक्रार निवारण यंत्रणा आणि ग्राहकांचे अधिकार.




**विद्यार्थ्यांसाठी विशेष वैशिष्ट्ये:** या पुस्तकाची मांडणी परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन केली आहे: १. **अभ्यासक्रम सुसंगत:** कलकत्ता विद्यापीठाच्या नवीन बी.कॉम अभ्यासक्रमानुसार याची रचना करण्यात आली आहे. २. **केस स्टडीज:** पुस्तकात अनेक खटल्यांचा (CASE LAWS) आणि त्यांच्या निर्णयांचा समावेश केला आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना कायद्याचा प्रत्यक्ष वापर कसा होतो, हे समजण्यास मदत होते. ३. **सराव आणि परीक्षा तयारी:** नवीन परीक्षा पद्धतीनुसार यात बहुपर्यायी प्रश्न (MCQS) दिले आहेत. ४. **प्रश्नपेढी (QUESTION BANK):** परीक्षेच्या तयारीसाठी सोडवलेल्या प्रश्नांची एक विस्तृत मालिका यात देण्यात आली आहे.

नव्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त व्यावसायिक कायद्याची गुंतागुंत सोप्या भाषेत मांडल्यामुळे हे पुस्तक बी.कॉमच्या प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. केवळ परीक्षेच्या दृष्टीनेच नव्हे, तर व्यावसायिक कारकीर्दीची पायाभरणी करण्यासाठीही हे एक उत्तम संदर्भ पुस्तक आहे.


# 'इन चेंबर्स : अ यंग लॉयर्स गाईड टू प्रॅक्टिस, एथिक्स अँड अडव्होकसी'

कायद्याचे शिक्षण पूर्ण करून जेव्हा एखादा तरुण वकील कोर्टाच्या विशाल आवारात पाऊल ठेवतो, तेव्हा पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्ष कोर्टातील कामकाज यात मोठी तफावत असल्याचे त्याला जाणवते. वकिलीच्या व्यवसायातील ही पोकळी भरून काढण्याचे **काम तळहा अब्दुल रहमान लिखित 'इन चेंबर्स :** अ यंग लॉयर्स गाईड टू प्रॅक्टिस, एथिक्स अँड ॲडव्होकसी' हे पुस्तक करत आहे.

वकिलीचा 'प्रॅक्टिकल' कानमंत्र नॅल्सार चे माजी विद्यार्थी आणि सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता (AOR) तळहा अब्दुल रहमान यांनी आपल्या अनुभवाचे सार या पुस्तकात मांडले आहे. सामान्यतः वकिलीतील बारकावे हे ज्युनिअर्सना सीनियर्सकडून हळूहळू शिकायला मिळतात. मात्र, या पुस्तकाच्या माध्यमातून ही 'गुरुकिल्ली' आता प्रत्येक नवोदित वकिलाला सहज उपलब्ध झाली आहे.

**पुस्तकाची प्रमुख वैशिष्ट्ये:** हे पुस्तक केवळ कायदेशीर सिद्धांतांवर भाष्य करत नाही, तर ते पूर्णपणे व्यावहारिक आहे. २१ प्रकरणांमध्ये विभागलेले हे पुस्तक खालील महत्त्वपूर्ण विषयांवर प्रकाश टाकते:

**कोर्टातील शिष्टाचार:** न्यायाधीशांसमोर कसे वागावे, बोलण्याची पद्धत काय असावी आणि कोर्टाच्या वातावरणात स्वतःला कसे जुळवून घ्यावे, याचे मार्गदर्शन.




**क्लायंट हँडलिंग:** अशिलांशी संवाद कसा साधावा, त्यांचे म्हणणे कसे ऐकून घ्यावे आणि त्यांचे कायदेशीर प्रश्न कसे सोडवावेत, यावर यात सविस्तर चर्चा आहे.

**कायदेशीर मसुदा आणि संशोधन:** उत्तम मसुदा कसा तयार करावा आणि प्रभावी कायदेशीर संशोधनासाठी कोणत्या तंत्रांचा वापर करावा, हे यात सोप्या भाषेत सांगितले आहे.

**व्यावसायिक नैतिकता :** वकिलीच्या व्यवसायात मूल्यांची जपणूक कशी करावी आणि नैतिक संकटांचा सामना कसा करावा, याचे धडे यात आहेत.

नवोदितांसाठी दिशादर्शक आजच्या बदलत्या काळात तंत्रज्ञानाचा वापर वकिलीत कसा करावा, याचाही अंतर्भाव यात करण्यात आला आहे. हे पुस्तक केवळ लॉ इंटर्न्स किंवा नुकतेच पास झालेल्या वकिलांसाठीच नाही, तर ज्यांना प्रॅक्टिसमध्ये अधिक प्रगल्भता हवी आहे, त्यांच्यासाठीही एक उत्तम साधन आहे.

'इन चेंबरस' हे पुस्तक म्हणजे केवळ माहितीचा साठा नसून, ती एक 'हँड्स-ऑन' मार्गदर्शिका आहे. शैक्षणिक पुस्तके आणि प्रत्यक्ष कोर्टरुममधील आव्हाने यांना जोडणारा हा एक भक्कम पूल आहे. जर तुम्ही कायद्याच्या क्षेत्रात करिअर करत असाल, तर हे पुस्तक तुमच्या संग्रही असणे निश्चितच फायदेशीर ठरेल.

# सुनावणीतून मागे हटण्यास वाव नसलेले खंडपीठ नेमा!

## सर्वोच्च न्यायालयाचे पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाला निर्देश; वकिलांच्या 'ट्रिक्स'वर सरन्यायाधीशांची तीव्र नाराजी

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

न्यायाधीशांनी वारंवार सुनावणीतून स्वतःला मागे घेण्याच्या (रेक्युजल) वाढत्या प्रवृत्तीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. एका महत्त्वाच्या प्रकरणात निर्देश देताना सर्वोच्च न्यायालयाने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या प्रभारी मुख्य न्यायमूर्तींना असे विशेष खंडपीठ स्थापन करण्यास सांगितले आहे, ज्यामध्ये न्यायाधीशांना कोणत्याही परिस्थितीत सुनावणीतून मागे हटण्याची मुभा नसेल. जर एखाद्या वकिलाने किंवा याचिकाकर्त्याने न्यायाधीशांना प्रकरणातून मागे हटण्यास भाग पाडण्यासाठी कोणतीही युक्ती वापरली, तर त्याचे गंभीर परिणाम होतील, असा कडक इशाराही न्यायालयाने दिला आहे.

हे संपूर्ण प्रकरण न्यायिक अधिकारी अमरीश कुमार जैन यांच्याशी संबंधित आहे. त्यांच्या सेवा समाप्तीला आव्हान देणारी एक याचिका २०२२ पासून पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या प्रकरणात धक्कादायक बाब म्हणजे, आतापर्यंत तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती शील नागू यांच्यासह उच्च न्यायालयाच्या तब्बल चार न्यायाधीशांनी या प्रकरणाच्या सुनावणीतून स्वतःला मागे घेतले आहे. अशाच प्रकारचे एक प्रकरण भारतीय वन सेवा (IFS) अधिकारी संजीव चतुर्वेदी यांच्याबाबतही घडले होते, जिथे डझनभर न्यायाधीशांनी सुनावणीतून माघार घेतली होती. वारंवार होणाऱ्या या प्रकाराला कंटाळून अमरीश कुमार जैन यांनी स्वतः सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालय आपली याचिका हाताळण्यास संस्थात्मकदृष्ट्या असमर्थ ठरत असल्याचा आरोप जैन यांनी केला. त्यांनी कलम १४२ अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अधिकारांचा वापर करून हे प्रकरण दिल्ली उच्च न्यायालयात वर्ग करण्याची मागणी केली होती.

या प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश (CJI) आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर झाली. सुनावणी दरम्यान सरन्यायाधीशांनी उच्च न्यायालयातील वकिलांच्या कार्यपद्धतीवर अत्यंत कडक शब्दांत ताशेरे ओढले. सरन्यायाधीश म्हणाले की, मला उच्च न्यायालयातील अशा तीन ते चार तथाकथित 'वरिष्ठ' वकिलांची नावे माहीत आहेत, जे न्यायालयात प्रचंड गोंधळ आणि अडथळे निर्माण करत आहेत. मी खंडपीठातील न्यायाधीशांना विनंती करेन की, कोणत्याही व्यक्तीने कशीही परिस्थिती निर्माण केली, तरी त्यांनी सुनावणीतून मागे हटू नये.



सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण दिल्लीला वर्ग न करता, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयालाच कडक नियमांसह सुनावणी पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. प्रभारी मुख्य न्यायमूर्तींना जैन यांच्या २०२२ च्या याचिकेवर सुनावणी करण्यासाठी दोन न्यायाधीशांचे विशेष विभागीय खंडपीठ (Division Bench) स्थापन करण्याची विनंती करण्यात आली आहे. या खंडपीठातील न्यायाधीशांनी कोणत्याही परिस्थितीत या प्रकरणाची सुनावणी सोडता कामा नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच १३ जुलैपासून सुरू होणाऱ्या आठवड्यापासून या प्रकरणाची रोजच्या रोज सुनावणी घेतली जावी आणि अंतिम निकाल राखीव ठेवावा, असे निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका आपल्याकडे प्रलंबित ठेवली असून, उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाने निकाल राखीव ठेवल्यानंतर, उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल यांनी सर्वोच्च न्यायालयात यासंबंधीचा 'पूर्तता अहवाल' सादर करावा, असेही आदेशात म्हटले आहे. या आदेशामुळे न्यायालयीन कामकाजात जाणीवपूर्वक अडथळे आणणाऱ्या वकिलांना आणि सुनावणी टाळणाऱ्या प्रवृत्तींना मोठा चाप बसण्याची शक्यता कायदेशीर वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

# थिएटरात एसी बंद;'पुष्पा २' पाहताना वकील घामाघूम!

## हैदराबाद ग्राहक मंचाचा दणका: वकिलाच्या तक्रारीनंतर थिएटरला ५००० रुपयांचा दंड आणि तिकीट परताव्याचे आदेश

पुणे बार अँड बेंच टीम
punebarandbench@gmail.com

थिएटरात चित्रपट पाहताना मिळणाऱ्या सोयी-सुविधांसाठी प्रेक्षक हजारो रुपये खर्च करतात, पण जर तिथेच मूलभूत सुविधा मिळाल्या नाहीत तर? असाच एक धक्कादायक प्रकार तेलंगणामध्ये समोर आला आहे. ब्लॉकबस्टर 'पुष्पा २' सिनेमा पाहायला गेलेल्या एका वकिलाला थिएटरात एसी बंद असल्यामुळे प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. याप्रकरणी हैदराबादच्या जिल्हा ग्राहक विवाद निवारण मंचाने थिएटर प्रशासनाला जोरदार दणका दिला आहे. ग्राहकाला झालेल्या त्रासाबद्दल थिएटरने तिकिटाचे पैसे परत करावेत आणि ५,००० रुपये भरपाई द्यावी, असा आदेश मंचाने दिला आहे.




हैदराबादमधील एका नामांकित वकिलाने ३१ डिसेंबर २०२४ रोजी आपल्या कुटुंबासह 'पुष्पा २' हा चित्रपट पाहण्यासाठी थिएटरचे ५२५ रुपयांचे तीन 'गोल्ड क्लास' तिकीट बुक केले होते. मात्र, शो सुरू झाल्यानंतर त्यांना समजले की थिएटरमधील वातानुकूलित यंत्रणा पूर्णपणे बंद होती. इतकेच नाही तर हॉलमधील साधे पंखेही फिरत नव्हते.

मध्यंतराच्या वेळी संबंधित वकिलाने ही बाब थिएटर मॅनेजरच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्यासोबतच इतर अनेक प्रेक्षकांनीही एसी बंद असल्याबद्दल तीव्र संताप व्यक्त केला. मात्र, थिएटर प्रशासनाने याकडे साफ दुर्लक्ष केले आणि कोणतीही सुधारीत कारवाई केली नाही. शेवटी हताश होऊन आणि कुटुंबाला झालेल्या त्रासामुळे संतप्त झालेल्या वकिलाने थेट ग्राहक मंचाचे दरवाजे ठोठावले.

ग्राहक मंचासमोर थिएटर प्रशासनाने सर्व आरोप फेटाळून लावले. हे 'एअर-कुल्ड' थिएटर असून येथील कूलिंग प्लांट दिवसभर सुरू असतो, असा दावा त्यांनी केला. मात्र, स्वतःचा बचाव करताना त्यांनी एक अजब तर्क मांडला. डिसेंबर महिना असल्याने हिवाळ्यामुळे अनेकदा प्रेक्षकच कूलिंग कमी करण्याची मागणी करतात, त्यामुळे त्या दिवशीही व्यवस्था तशीच असावी, असा दावा थिएटरने केला. तसेच, त्या शोसाठी केवळ ५७ प्रेक्षक उपस्थित होते, त्यामुळे सेवांमध्ये कोणतीही त्रुटी नव्हती, असे म्हणत त्यांनी तक्रार फेटाळण्याची मागणी केली. मंचाचे अध्यक्ष वक्कंती नरसिंहा राव आणि सदस्य पी. व्ही. टी. आर. जवाहर बाबू आणि डी. श्रीदेवी यांच्या खंडपीठाने दोन्ही बाजू ऐकून घेतल्या. मंचाने थिएटरच्या दुटप्पी भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला.

थिएटर प्रशासन एकीकडे कूलिंग प्लांट नेहमी सुरू असल्याचा दावा करत आहे, तर दुसरीकडे हिवाळ्याचे कारण पुढे करून प्रेक्षकच कूलिंग कमी करायला सांगतात असा परस्परविरोधी युक्तिवाद करत आहे. कमी उपस्थितीचे आडोसे घेऊन थिएटर आपल्या जबाबदारीतून मुक्त होऊ शकत नाही. थिएटरचा हा दुटप्पी आणि विरोधाभासी बचावच हे सिद्ध करण्यासाठी पुरेसा आहे की तक्रारदार आणि त्यांच्या कुटुंबाला चित्रपट पाहताना नाहक त्रास सहन करावा लागला, असे ग्राहक मंचाने २० मे रोजीच्या आपल्या आदेशात स्पष्टपणे नमूद केले. मंचाने थिएटर प्रशासनाला 'सेवेतील त्रुटी' आणि 'अयोग्य व्यापारी प्रथा' यासाठी दोषी धरले.

ग्राहक मंचाचा अंतिम निकाल आणि दंड:

मंचाने वकिलाच्या बाजूने निकाल देत थिएटरला तिकीट शुल्काचे ५२५ रुपये तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून ९ टक्के व्याजासह परत करावेत. मानसिक त्रासाची भरपाई देताना प्रेक्षकाला झालेल्या मनस्ताप आणि गैरसोयीबद्दल ३,००० रुपये द्यावेत.

तसेच वकिलाला खटल्याचा खर्च म्हणून २,००० रुपये द्यावेत, असे आदेश दिले .

थिएटरला या आदेशाचे पालन करण्यासाठी ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. जर या मुदतीत पैशांचे प्रदाण केले नाही, तर थिएटरला आणखी २,००० रुपये अतिरिक्त नुकसानभरपाई म्हणून द्यावे लागतील, असा कडक इशाराही मंचाने दिला आहे. या निकालामुळे ग्राहकांच्या हक्कांची गळचेपी करणाऱ्या थिएटर मालकांना चांगलाच धडा मिळाला आहे.

NATARAJ REALTY
Nataraj Realty
CIVIL ENGG. & CONTRACTORS
PROMOTERS & BUILDERS
Vikram Agarwal B.E. Civil
+91 9766532648
1041, Nataraj Court, Shukrawar Peth, Pune - 411 002
vikrammittal5006@gmail.com www.natarajrealty.com

Registration(PRGI) No. MHBIL/25/A1380: "Pune Bar And Bench", weekly newspaper owned & published by Vijay Prabhakar Chavan, and printed by Prasad Shantaram Pathak at the Sakal Media Pvt Ltd, Sr No. 159/160, behind Laxman Weigh Bridge, Saswad Road, Pune- 411028, Published at Pune Bar And Bench, Office No. 7, 1st floor, Chunawala Chambers, 103, Shivajinagar, Near Shikshan Mandal, Juna Topkhana, Pune-411005. Resident Editor : Vijay Prabhakar Chavan (Responsible for selection of news under PRB Act.)
Managing Editor: Mr. Mysore Jagadishbabu Srikant. All rights reserved. Reproduction in whole or in part without written permission of the publisher is prohibited. (contact : 99229 62535)